# महाराष्ट्र चेंबर पत्रिका

October 2022 /Issue. No.6/ Price : Rs. 30/-




## महाराष्ट्र पुन्हा होणार देशात अग्रेसर

दिपावली व नववर्ष महाराष्ट्रातील तमाम जनतेचा उत्कर्ष करणारे व सुखसमृध्दी आणणारे ठरो, याच शुभेच्छा !

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स च्या पाठपुराव्यास महत्वपुर्ण यश

उद्योग क्षेत्राचे प्रलंबित अनुदान वितरण करण्यास मंजुरी

उद्योगांसाठी प्रोत्साहन अनुदान योजनेस कोरोना कालखंडाची मुदतवाढ देण्यास मंजुरी

उद्योग वृध्दी यात्रा

WOMEN ENTREPRENEURSHIP POLICY
महिला
उद्योजकता विकास अभियान

मा. मुख्यमंत्री,
मा. उपमुख्यमंत्री,
मा. उद्योग मंत्री व
राज्य सरकारला
मन:पुर्वक धन्यवाद !

# ध · न्य · वा · द



मान. देवेंद्रजी फडणवीस
उपमुख्यमंत्री

मान. एकनाथजी शिंदे
मुख्यमंत्री

नाम. उदयजी सामंत
उद्योग मंत्री

'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर'
या राज्यातील व्यापार, उद्योग, कृषी उद्योग, सेवा उद्योग क्षेत्राच्या शतकमहोत्सवी शिखर संस्थेने, राज्यातील उद्योगांचे प्रलंबित अनुदान त्वरीत द्यावे. तसेच उद्योगांना प्रोत्साहन अनुदान योजना पात्रतेसाठी कोरोना काळाची मुदत वाढ देण्याची मागणी केली होती.
या दोन्ही मागण्या मान्य केल्याबद्दल
मा. मुख्यमंत्री नाम. एकनाथजी शिंदे,
मा. उपमुख्यमंत्री नाम. देवेंद्रजी फडणवीस,
मा. उद्योग मंत्री नाम. उदयजी सामंत

## यांना मनःपुर्वक धन्यवाद !

MACCIA 100

**महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर**
स्वातंत्र्यपूर्व काळापासून महाराष्ट्राच्या औद्योगिकतेचा पाया रचणारी
व्यापार, उद्योग व कृषी उद्योगक्षेत्राची शतकमहोत्सवी शिखर संस्था

MACCIA 100
Apex Chamber of the State 1927-2027
MAHARASHTRA CHAMBER OF COMMERCE, INDUSTRY & AGRICULTURE

# महाराष्ट्र चेंबर पत्रिका

October 2022 / Issue No. 6

## महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँण्ड ॲग्रिकल्चर

ओरिकॉन हाऊस, ६ वा मजला, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स मार्ग, काळा घोडा, फोर्ट, मुंबई- ४००००१
फोन : (०२२) २२८५५८५९/६०
ई-मेलः maccia@maccia.org.in
वेबसाईट : www.maccia.org.in

### संपादकीय समिती

- अध्यक्ष
  **ललित गांधी**
- वरिष्ठ उपाध्यक्ष
  **उमेश दाशरथी**
- उपाध्यक्ष
  **करुणाकर शेट्टी**
  **शुभांगी तिरोडकर**
  **रविंद्र माणगावे**
  **सुधाकर देशमुख**
  **चंद्रशेखर पुनाळेकर**
  **तनसुख झांबड**
- प्रभारी सरकार्यवाह
  **सागर नागरे**
- संपादक
  **विनी दत्ता**
- सहसंपादक
  **अविनाश पाठक**

- **शाखा कार्यालय**
- २०१, सारडा संकुल, वकीलवाडी, नाशिक - १. फोनः (०२५३)२५७७७०४ । ई-मेलः nsk@maccia.org.in
- **रत्नागिरी जिल्हा कार्यालय**
  जावकर प्लाझा, जयस्तंभ, रत्नागिरी.

**Note :** Articles published in this bulletin do not necessarily reflect the views of the Maharashtra Chamber of Commerce, Industry & Agriculture.

# अंतरंग

१. मनोगत
२. व्यापार उद्योगाच्या विकासासाठी आधुनिक तंत्रज्ञानाची कास धरावी - ना. नारायण राणे
३. राज्यातील उद्योग क्षेत्राला गतवैभव पुन्हा प्राप्त करून देणार - ना उदय सामंत
४. महाराष्ट्र चेंबरने राज्यामध्ये तरुण व महिलांसाठी कौशल्य विकास केंद्र सुरू करावे - मंगलप्रभातजी लोढा
५. महाराष्ट्र राज्यस्तरीय महिला उद्योजकता विकास अभियान
६. राज्यात लॉजिस्टिक पार्क आणि नऊ ड्रायपोर्ट सुरू करणार - उद्योगमंत्री उदय सामंत
७. महाराष्ट्रातील उद्योग प्रकल्पांचे प्रलंबित अनुदान त्वरित अदा करावे - ललित गांधी
८. महाराष्ट्र व गोवा राज्य उद्योग वाढीसाठी संयुक्त उपक्रम राबवणार - ना. प्रमोद सावंत
९. भारत इंग्लंड दरम्यान व्यापार वृद्धीसाठी विशेष योजना बनवू - ब्रिटिश खासदार जॉन वेवरली
१०. मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम
११. स्टार्टअप मधुन लाखो रोजगार निर्माण होतील
१२. महाराष्ट्रातील बंदरे
13. Role of District Industries Centers & Various Schemes
14. National Logistics Policy 2022- The Unveiling of a new era in Logistics
१५. महाराष्ट्रातील महिलांना आत्मनिर्भरतेसाठी केंद्र सरकारकडून पाठबळ देणार - स्मृती इराणी
१६. व्यापार उद्योगात यशस्वी होण्यासाठी सतत प्रयत्नशील रहावे - ललित गांधी



## संपादकीय..

ललित गांधी
अध्यक्ष

**सन्माननीय बंधू-भगिनींनो,**
सप्रेम नमस्कार,

महाराष्ट्रातील तमाम जनतेला, व्यापार, उद्योग, सेव उद्योग, कृषि प्रक्रिया उद्योग क्षेत्रातील सर्व मान्यवरांना, म हाराष्ट्र चेंबरच्या सर्व सभासदांना दिपोत्सव व नुतन वर्षाच्या हार्दीक शुभेच्छा देताना मला मनस्वी आनंद होत आहे.

गणेशोत्सव, विजयादशमी, नवरात्री या उत्सवांच्या मालिकेपासुन महाराष्ट्रातील बाजारपेठांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे.

या दिपोत्सवामध्ये हा उत्साह शिखरापर्यंत जाईल व एकुणच महाराष्ट्राच्या व्यापार, उद्योगासह एकुणच अर्थविश्वाला गेल्या दोन वर्षात आलेली मरगळ दुर होऊन व्यापार, उद्योगाची चक्रे गतीमान होतील याचा विश्वास आहे.

महाराष्ट्राच्या आर्थिक विकासासाठी व्यापार, उद्योग क्षेत्राला बळ देण्याचे कार्य 'महाराष्ट्र चेंबर' गेली शंभर वर्षे करीत आहे. तीच परंपरा येणाऱ्या शंभर वर्षापर्यंत अधिक गतिमान होईल यासाठी सध्याची कार्यकारीणी विविध स्तरांवर कार्यरत आहे.

व्यापार, उद्योग, सेवा उद्योग, प्रक्रिया उद्योग विविध समस्यांना नेहमीच सामोरे जात आहे, याची 'महाराष्ट्र चेंबर'ला पुरेपुर जाणीव आहे. राज्य व केंद्र शासन स्तरावर या समस्यांवर तोडगा काढण्यासाठी महाराष्ट्र चेंबर नेहमीच प्रयत्नशील आहे. वेळप्रसंगी सरकारशी दोन हात करण्यासही चेंबर आघाडीवर राहाते.

समस्यांच्या सोडवणुकीबरोबरच विकासाच्या नवीन संधी, व्यापार, उद्योग प्रगतीसाठी राष्ट्रीय-अंतराष्ट्रीय स्तरावर नवीन क्षितिजापर्यंत मार्गक्रमण करणे यासाठी 'महाराष्ट्र चेंबर' नेहमीच आघाडीवर आहे.

राज्यातील महिला व युवकांना व्यापार, उद्योगातील नवीन संधीची माहीती देणे व नवीन उद्योगात येण्यासाठी प्रकल्प अहवालासह अर्थसहाय्यापर्यंत नेमके मार्गदर्शन व सहाय्य करणे यासाठी 'महाराष्ट्र चेंबर' जिल्हया जिल्ह्यापर्यंत पोहोचणार आहे.

केंद्रीय एमएसएमई मंत्री नाम. नारायणजी राणे यांनी राज्यस्तरीय 'महिला उद्योजकता विकास अभियान' व 'उद्योग वृध्दी यात्रा' या दोन संकल्पनांच्या बोधचिन्हाचे अनावरण केले आहे. या माध्यमातुन राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील महिला व तरूणांना उद्योजकतेची प्रेरणा मिळून नवीन उद्योजक तयार होणार आहेत. ही शक्ती महाराष्ट्राला पुन्हा एकदा देशात अव्वल स्थानी नेण्यात यशस्वी होईल याची खात्री आहे.

संपुर्ण महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाचा 'रोड मॅप' तयार करण्यासाठी जिल्हा स्तरावर 'जिल्हा डेव्हलपमेंट फोरम' ची स्थापना करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. प्रत्येक जिल्ह्यातील रस्ते, रेल्वे, हवाई वाहतुक यासह पायाभुत सुविधांच्या अपेक्षा, व्यापार, उद्योग, सेवा उद्योग, कृषि उद्योग, पर्यटन या विषयक विकासाच्या अपेक्षा या सर्वांचा अंतर्भाव असलेले प्लॅनिंग आपल्याला करावयाचे आहे. नियोजनाचे हे कार्य या फोरम च्या माध्यमातुन सर्वसंमतीने करण्यात येईल.

'महाराष्ट्र चेंबर' च्या सर्व सभासदांमध्ये जिल्हा स्तरावर आपापसांत व्यापार वाढावा स्थानिक स्तरांवर सभासद व बिगर सभासदांत व्यापार, उद्योग वाढावा यासाठी स्वतंत्र आयोजन सुरू करण्यात येत आहेत.

एकुणच चेंबरचे कार्य जिल्हा स्तरापर्यंत प्रभावीपणे पोचविणे, जिल्हा स्तरावरील स्थानिक व्यापारी, उद्योग संघटनांशी समन्वय ठेवुन स्थानिक संघटना मजबुत करणे यासाठी 'महाराष्ट्र चेंबर'ने जिल्हास्तरावर स्वतंत्र कार्यालय सुरू करण्याचा निर्णय घेतला असुन, या निर्णयाप्रमाणे पहिले जिल्हा कार्यालय 'रत्नागिरी' येथे उद्योगमंत्री नाम. उदय सामंत यांच्या हस्ते उद्घाटन करून सुरू करण्यात आले आहे.

या कार्यालयामुळे महाराष्ट्र चेंबरच्या जिल्हास्तरावर क्लस्टर्स/कॉमन फॅसिलिटी सेंटर उभारणीच्या कार्याला सुध्दा गती मिळणार आहे.

लवकरच 'पुणे' येथे विभागीय शाखा कार्यालय व 'जळगाव' येथे जिल्हा कार्यालय सुरू करण्यात येत आहे.

एकुणच येणाऱ्या नववर्षाच्या पार्श्वभुमीवर 'महाराष्ट्र चेंबर' नव्या उत्साहाने, अधिक उर्जेने आपल्या योजना पुर्ण करण्यासाठी सभासदांच्या सक्रीय सहभागाने यशस्वी होईल याचा विश्वास आहे.

पुन्हा एकदा सर्वांना हार्दीक शुभेच्छा !

# व्यापार उद्योगाच्या विकासासाठी आधुनिक तंत्रज्ञानाची कास धरावी - ना. नारायण राणे

## महाराष्ट्र चेंबरच्या विविध उपक्रमांचे नाम. नारायण राणे यांच्या हस्ते लोकार्पण




**महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर च्या ९४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत मार्गदर्शन करताना केंद्रीय एमएसएमई मंत्री नारायणजी राणे.**

महाराष्ट्र राज्य भारतात प्रगत राज्य म्हणून नावारूपाला आलेले आहे. वैद्यकीय उत्पादन क्षेत्रात, जीडीपीमध्ये पुढे आहे. आत्मनिर्भर भारत बनवणे व महासत्तेकडे वाटचाल करताना सूक्ष्म लघु व मध्यम विभागाकडे आशावादी दृष्टिकोनातून बघितले जात आहे. उत्पन्न कसे वाढेल यावर लक्ष देणे गरजेचे आहे. आधुनिकरणामुळे उत्पादन वाढते, उत्पादन वाढले की नफा वाढत जातो. आधुनिकीकरण ही काळाची गरज असून स्वावलंबी होण्यासाठी अत्यावश्यक आहे. निर्यात वाढवा, आयात कमी करा असे केंद्रीय सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग मंत्री नारायण राणे म्हणाले. तसेच महाराष्ट्र चेंबरने राज्यामध्ये उद्योग उभारणीसाठी मार्गदर्शनपर कार्यक्रमांचे आयोजन करावे, सूक्ष्म लघु व मध्यम उद्योगांना मदत करावी, बंद व आजारी उद्योग व्यवस्थित सुरू होण्यासाठी त्यांना मार्गदर्शन व शासनाची मदत मिळवून देण्यास सहकार्य करावे. सूक्ष्म लघु व मध्यम विभागाकडून महाराष्ट्र चेंबरला आवश्यक ती सर्व मदत देण्यात येईल असे आश्वासन ना. नारायण राणे यांनी दिले.

राज्यातील व्यापार उद्योग कृषी क्षेत्राच्या विकासासाठी महाराष्ट्र चेंबर प्रामाणिकपणे प्रयत्न करत आहे. महाराष्ट्र चेंबरच्या कार्याचे कौतूक ना. नारायण राणे यांनी याप्रसंगी केले. राज्यस्तरीय उद्योग परिषदेमध्ये मुख्य पाहुणे भारत सरकारचे सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग मंत्री नाम.नारायण राणे यांनी भारताच्या सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग क्षेत्राची प्रगती भारतीय अर्थव्यवस्थेचे इंजिन या विषयावर मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. पी. अनबलगन यांनीही यावेळी विशेष मार्गदर्शन केले. तसेच महिला उद्योजकता समितीचे धोरण व युथ विंग समिती व सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग समितीच्या लोगोचे अनावरण करण्यात आले.

महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी ना. नारायण राणे यांचा सत्कार केला व प्रास्ताविक करताना राज्यस्तरीय उद्योग परिषदेची सविस्तर माहिती दिली. महाराष्ट्र चेंबरतर्फे राज्यांमध्ये महिला समिती व युथ विंग आणि सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग समिती यांच्यामार्फत महिला व तरुणांसाठी उद्योग वृद्धी यात्रा आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती दिली. तसेच महाराष्ट्र चेंबर तर्फे राज्यातील ३६ जिल्ह्यात महिला क्लस्टर, कृषी क्लस्टर व उत्पादनआधारित क्लस्टरची निर्मिती करण्यात येणार असल्याचे सांगितले.




**महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर च्या ९४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत मार्गदर्शन करताना चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी व्यासपीठार केंद्रीय एमएसएमई मंत्री नारायणजी राणे, महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. पी. अनबलगन व उपस्थित मान्यवर**

भारत अमेरिकेदरम्यान व्यापार उद्योग वाढीसाठी इंडो यूएस डेव्हलपमेंट फोरमची स्थापना महाराष्ट्र चेंबरतर्फे करण्यात आली असून परत अमेरिकेत गुळ व आंबा महोत्सवाचे आयोजन करण्यात येणार असल्याचे सांगितले. व्यापार उद्योगांच्या विविध अडचणींची माहिती याप्रसंगी दिली व राज्यांमध्ये प्लास्टिक बंदीला स्थगिती देण्यात यावी अशी मागणी अध्यक्ष ललित गांधी यांनी केली.

याप्रसंगी व्यासपीठावर महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, मुख्य पाहुणे भारत सरकारचे सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग मंत्री नाम. नारायण राणे, वरिष्ठ उपाध्यक्ष उमेश दाशरथी, उपाध्यक्ष करुणाकर शेट्टी, उपाध्यक्ष सौ. शुभांगी तिरोडकर, उपाध्यक्ष रवींद्र मानगावे, उपाध्यक्ष सुधाकर देशमुख, उपाध्यक्ष चंद्रशेखर पुनाळेकर, उपाध्यक्ष तनसुख झांबड, वर्ल्ड ट्रेड सेंटरचे चेअरमन विजय कलंत्री, महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. पी. अनबलगन उपस्थित होते. राज्यस्तरीय परिषदेत महाराष्ट्र चेंबरचे कार्यकारिणी सदस्य व राज्यभरातील व्यापारी उद्योजक मोठया संख्येने उपस्थित होते.




**कार्यक्रमप्रसंगी मार्गदर्शन करताना महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. पी. अनबलगन, वरिष्ठ उपाध्यक्ष उमेश दाशरथी, वर्ल्ड ट्रेड सेंटरचे चेअरमन विजय कलंत्री.**

# राज्यातील उद्योग क्षेत्राला गतवैभव पुन्हा प्राप्त करून देणार - ना उदय सामंत

## महाराष्ट्र चेंबरच्या पदाधिकाऱ्यांसमवेत संयुक्त बैठक घेण्याचे अध्यक्ष ललित गांधी यांना आश्वासन




**महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर च्या ९४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत मार्गदर्शन करताना उद्योग मंत्री उदय सामंत व्यासपीठावर उपस्थित मान्यवर.**

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रिकल्चरतर्फे मेक इन महाराष्ट्रमध्ये उद्योगांची भूमिका या विषयावर राज्यस्तरीय उद्योग परिषद दिनांक १५ सप्टेंबर२०२२ रोजी वर्ल्ड ट्रेड सेंटर, मुंबई येथे संपन्न झाली.

महाराष्ट्र सरकारचे उद्योग मंत्री उदय सामंत यांनी राज्यातील उद्योगांना गतवैभव पुन्हा प्राप्त करून देण्यासाठी सरकार प्रयत्न करत आहे. महाराष्ट्र चेंबर प्रत्येक जिल्ह्यात जाऊन उद्योजक वाढविण्याचे जे काम करते ते कौतुकास्पद आहे. व्यापार उद्योगाच्या विकासासाठी जे जे आवश्यक असेल ते सर्व सहकार्य व उद्योजकांच्या मागण्या पूर्ण करण्यात येतील.

राज्यातील व्यापारी उद्योजकांच्या अडचणी सोडविण्यासाठी महाराष्ट्र चेंबरच्या पदाधिकाऱ्यांबरोबर संयुक्त बैठक आयोजित करण्याचे आश्वासन उद्योग मंत्री सामंत यांनी दिले. मोठी गुंतवणूक व मोठा रोजगार उपलब्ध करणारे उद्योग राज्यात आणणार असून महाराष्ट्राला उद्योग क्षेत्रात भविष्यात गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी नवीन उद्योजकांना जास्तीत जास्त सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जाईल. मोठे उद्योग महाराष्ट्रात आणण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याची माहिती उद्योग मंत्री सामंत यांनी दिली.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रिकल्चरतर्फे आयोजित राज्यस्तरीय उद्योग परिषदेत मेक इन महाराष्ट्रमध्ये उद्योगांची भूमिका या विषयावर उद्योग मंत्री सामंत यांनी मार्गदर्शन केले.

महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी ना. उदय सामंत यांचा सत्कार केला व प्रास्ताविक करताना राज्यस्तरीय उद्योग परिषदेची सविस्तर माहिती दिली. तसेच महाराष्ट्र चेंबर तर्फे राज्यांमध्ये महिला समिती व युथ विंग आणि सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग समिती यांच्यामार्फत महिला व तरुणांसाठी उद्योग वृद्धीयात्रा आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती दिली. तसेच महाराष्ट्र चेंबर तर्फे राज्यातील ३६ जिल्ह्यात महिला क्लस्टर, कृषी क्लस्टर व उत्पादनआधारित क्लस्टरची निर्मिती करण्यात येणार असल्याचे सांगितले.

ललित गांधी पुढे म्हणाले की, राज्यातील एमआयडीसीच्या औद्योगिक वसाहती, सहकारी व खाजगी औद्योगिक वसाहती यांच्या विविध समस्या तात्काळ सोडविणे गरजेचे आहे. तसेच प्रलंबित अनुदान, पात्रता निकष मुदतवाढ याबाबींवर उद्योग मंत्र्यांनी तात्काळ निर्णय घ्यावा अशी मागणी केली.



कार्यक्रमाचे दिपप्रज्वलन करून उद्घाटन करताना केंद्रीय मंत्री नारायण राणे सोबत अध्यक्ष ललित गांधी व मान्यवर




केंद्रीय एमएसएमई मंत्री नारायण राणे यांना स्मृतीचिन्ह देऊन सत्कार करताना अध्यक्ष ललित गांधी व मान्यवर



महाराष्ट्र चेंबरच्या ९४ व्या वार्षिक अहवालाचे प्रकाशन करताना ना. नारायण राणे सोबत ललित गांधी.



मंत्री महोदयांना महाराष्ट्रातील उद्योगांसमोरील समस्या व मागण्यांबाबत माहीती देताना अध्यक्ष ललित गांधी




महाराष्ट्राचे उद्योग मंत्री नाम. उदय सामंत यांना स्मृतीचिन्ह देऊन सत्कार करताना अध्यक्ष ललित गांधी




पर्यावरण समिती च्या आगामी उपक्रमांची माहीती देताना समितीच्या चेअरमन धनश्री हरदास




महाराष्ट्र चेंबरच्या ९४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेप्रसंगी उपस्थित ना. नारायण राणे, ना. उदय सामंत, ललित गांधी, डॉ. पी. अनबलगन, विजय कलंत्री, उमेश दाशरथी, करुणाकर शेट्टी, सुधाकर देशमुख, रविंद्र माणगावे, शुभांगी तिरोडकर, तनसुख झांबड, चंद्रशेखर पुनाळेकर

# महाराष्ट्र चेंबरने राज्यामध्ये तरुण व महिलांसाठी कौशल्य विकास केंद्र सुरू करावे - मंगलप्रभातजी लोढा

## राज्यात कौशल्य विकास उपक्रम राबवण्यासाठी सहकार्याचे ललित गांधी यांना आश्वासन




**कौशल्य विकास परिषदेस संबोधन करताना माननीय ना. मंगलप्रभात लोढा.**

**मुंबई** : कुशल मनुष्यबळ ही काळाची गरज झाली आहे आणि ज्याच्या जवळ कुशल मनुष्यबळ आहे त्यांनी त्यांना सांभाळून ठेवणे गरजेचे आहे. एम्पॉवरमेंट ब्युरो विभागाची तुम्ही मदत घेऊ शकता त्यांच्या साह्याने राज्यांमध्ये तुम्ही छोटे कौशल्य विकास सेंटर सुरू करावे, इंक्युबॅशन सेंटर सुरू करावे तरुणांना प्रशिक्षित करून उद्योग व्यापार करण्यासाठी मदत करावी या उद्देशाने काम करावे. महाराष्ट्र शासनाचा कौशल्य विकास विभाग तुम्हाला पूर्ण सहकार्य करेल तुमच्या पाठीशी असेल. तसेच महिला बालविकास विभागाचे काम माझ्याकडे असून एक लाख दहा हजार अंगणवाड्या आहेत. या अंगणवाड्यांना आपण मदत करणे आवश्यक आहे. महिला बाल सुधार गृहातील महिला व तरुणी आहेत त्यांच्यासाठी कौशल्य सेंटर सुरू करावे त्यांना त्यांच्या पायावर उभे करण्यास सहकार्य करावे असे आवाहन पर्यटन व कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभातजी लोढा यांनी केले. तसेच महाराष्ट्र चेंबर तर्फे राज्यात व्यापार उद्योगाच्या वाढीसाठी सुरू असलेले उपक्रम विशेषता तरुणांसाठी व महिलांसाठी कौशल्य विकास व महिला उद्योजकता समितीतर्फे सुरू असलेल्या उपक्रमांचे कौतुक केले व राज्यात कौशल्य विकास उपक्रम राबवण्यासाठी महाराष्ट्र चेंबरला सहकार्याचे आश्वासन अध्यक्ष ललित गांधी यांना दिले.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँण्ड अग्रिकल्चर तर्फे राज्यस्तरीय परिषदेत युवा सक्षमीकरणासाठी कौशल्य विकासाची भूमिका आणि राष्ट्र निर्माण या विषयावर महाराष्ट्र सरकारचे पर्यटन व कौशल्य विकास मंत्री नाम. मंगलप्रभात लोढा यांनी मार्गदर्शन केले. महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांच्या अध्यक्षतेखाली परिषद संपन्न झाली.

सुरवातीला महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी पर्यटन व कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभातजी लोढा यांचे स्वागत केले. महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी प्रास्ताविक करताना राज्यस्तरीय उद्योग परिषदेची सविस्तर माहिती दिली. महाराष्ट्र चेंबर स्वातंत्र्यपूर्व काळापासून राज्याच्या व्यापार, उद्योग, कृषी क्षेत्राच्या विकासासाठी कार्यरत






**कौशल्य विकास परिषदेचे दीप प्रज्वलन करून उद्घाटन करताना माननीय ना. मंगलप्रभात लोढा समवेत महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, उपाध्यक्ष करुणाकर शेट्टी, सौ. शुभांगी तिरोडकर, सुधाकर देशमुख, वर्ल्ड ट्रेड सेंटरचे चेअरमन विजय कलंत्री आदि. दुसऱ्या छायाचित्रात नाम. मंगलप्रभात लोढा यांचा स्मृतीचिन्ह देवुन सत्कार करताना अध्यक्ष ललित गांधी.**

असल्याचे सांगितले. तसेच राज्यातील व्यापार उद्योगाला जागतिक स्तरावर संधी उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र चेंबरने केलेल्या कार्याची माहिती दिली. महाराष्ट्र चेंबरच्या महोत्सवी वर्षापर्यंतच्या ६ वर्षांची ब्लु प्रिंट सादर केली. ज्यामध्ये महाराष्ट्राच्या ६ विभागासाठी महिला उद्योजिका क्लस्टर, कृषिपूरक उद्योगांचे क्लस्टर व उत्पादन आधारित उत्पादनांचे ६ क्लस्टर चेंबरच्या पुढाकाराने उभारण्यात येणार असल्याचे सांगितले. तसेच युवा सक्षमीकरण व कौशल्य विकासाच्या दृष्टीने महाराष्ट्र चेंबर तर्फे बिझनेस सोल्युशन पॉलीक्लीनिक प्रोग्राम या उपक्रमाच्या अंतर्गत राज्यातील महाविद्यालय व उद्योगांच्या सहकार्याने महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना शिक्षण घेत असताना प्रत्यक्ष उद्योगातील कामाचा अनुभव देण्यात असून त्यांना विविध तज्ञ मंडळी मार्गदर्शनही करत आहेत. या उपक्रमांतर्गत उद्योगांना कुशल मनुष्यबळ उपलब्ध करून देणे व विद्यार्थ्यांनाही योग्य ठिकाणी संधी मिळवून देण्याचे काम होत असल्याचे अध्यक्ष ललित गांधी यांनी सांगितले. तसेच महाराष्ट्र चेंबर तर्फे राज्यांमध्ये महिला समिती व युथ विंग आणि सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग समिती यांच्यामार्फत महिला व तरुणांसाठी उद्योग वृद्धी यात्रा आयोजित करत असल्याची माहिती दिली.

याप्रसंगी व्यासपीठावर महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, मुख्य पाहुणे नाम. मंगलप्रभात लोढा, पर्यटन व कौशल्य विकास मंत्री, महाराष्ट्र सरकार वरिष्ठ उपाध्यक्ष उमेश दाशरथी, उपाध्यक्ष करुणाकर शेट्टी, उपाध्यक्ष सौ. शुभांगी तिरोडकर, उपाध्यक्ष रवींद्र मानगावे, उपाध्यक्ष सुधाकर देशमुख, उपाध्यक्ष चंद्रशेखर पुनाळेकर, उपाध्यक्ष तनसुख झांबड, वर्ल्ड ट्रेडसेंटरचे चेअरमन विजय कलंत्री उपस्थित होते. परिषदेला व्यापारी उद्योजक मोठ्या संख्येने उपस्थित होते.





# महाराष्ट्र राज्यस्तरीय महिला उद्योजकता विकास अभियान

## MSME , भारत सरकार व महाराष्ट्र चेंबरच्या महिला समितीचा उपक्रम




महिला उद्योजकता अभियानाचे लोकार्पण करताना MSME केंद्रीय मंत्री माननीय नारायणजी राणे, महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, महिला उद्योजकता समिती चेअरपर्सन सौ संगीता पाटील, चेंबरचे पदाधिकारी व महिला समिती सदस्य

**मुंबई** : सूक्ष्म ,लघु आणि मध्यम उद्योग (MSME) भारत सरकार व महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री अँड एग्रीकल्चर च्या महिला उद्योजकता समितीच्या अंतर्गत माननीय केंद्रीय मंत्री नारायणजी राणे व महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललितजी गांधी यांच्या मार्गदर्शनाने राज्यभरातील ३६ जिल्ह्यांमध्ये महिला उद्योजकता विकास अभियान राबविण्यात येणार आहे.

महाराष्ट्रात महिला उद्योजकता संस्कृतीला चालना देणे, जिल्हा पातळीवर महिलांच्या उद्योजकता विकासास चालना देणे, महिलांच्या सामाजिक गरजा पूर्ण करण्यासाठी नाविन्यपूर्ण व्यवसाय आणि नाविन्यास प्रोत्साहन देणे जेणेकरून महाराष्ट्रातील महिला आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र आणि स्वावलंबी राहू शकतील अशाप्रकारे अभियानाचे मुख्य उद्दिष्टे असणार आहे, अशी माहिती महिला उद्योजक समितीच्या चेअरपर्सन सौ. संगीता पाटील यांनी दिली.

वर्ल्ड ट्रेड सेंटर ,मुंबई येथे महाराष्ट्र चेंबरच्या ९४ वार्षिक सभेत महिला उद्योजकता विकास अभियान योजनेचे लोकार्पण माननीय नारायणजी राणे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी चेंबरचे अध्यक्ष ललितजी गांधी, महिला उद्योजकता समिती चेअरपर्सन संगीता पाटील, वरिष्ठ उपाध्यक्ष उमेश दाशरथी, उपाध्यक्ष करुणाकर शेट्टी, रवींद्र मानगावे, सुधाकर देशमुख,




महिला उद्योजकता विकास अभियानाबद्दल माहीती देताना सौ संगीता पाटील सोबत व्यासपीठावर उपस्थित मान्यवर.

चंद्रशेखर पुनाळेकर, तनसुख झांबड, शुभांगी तिरोडकर, महिला समिती सदस्य गौरी खेर गीता करमसी , श्वेता इनामदार तसेच चेंबरचे सर्व एक्सपर्ट कमिटी, गव्हर्निंग कौन्सिल मेंबर्स व महाराष्ट्रातील सर्व सदस्य उपस्थित होते. या योजनेंतर्गत महिला उद्योजकता समिती व संबंधित शासकीय अधिकारी सर्व ३६ जिल्ह्यांचा दौरा करून प्रत्येक जिल्ह्यात महिला उद्योजकता परिषदेच्या माध्यमातुन जनजागरण करण्यात येत आहे.

# राज्यात उद्योग वृध्दी यात्रा

## एमएसएमई - भारत सरकार, उद्योग विभाग - महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र चेंबरच्या युवा समिती, एमएसएमइ समितीचा उपक्रम




**महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर च्या उद्‌योग वृध्दि यात्रा अभियानाच्या लोगोचे अनावरण करताना MSME केंद्रीय मंत्री माननीय नारायणजी राणे, महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, डॉ. पी. अनबलगन, विजय कलंत्री, उमेश दाशरथी, करुणाकर शेट्टी, रविंद्र माणगावे, तनसुख झांबड, सदिप भंडारी, आशिष नहार**

सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योग मंत्रालय, भारत सरकार, उद्योग मंत्रालय, महाराष्ट्र शासन महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रिकल्चर यांच्या संयुक्त विद्यमानाने, माननीय केंद्रिय मंत्री नारायण राणे, राज्याचे उद्योग मंत्री उदयजी सामंत यांच्या मार्गदर्शनात व महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांच्या नेतृत्वात राज्यभरातील ३६ जिल्ह्यात महाराष्ट्र चेंबरचे संस्थापक शेठ वालचंद हिराचंद यांच्या जयंती दिनापासून दि. २३ नोव्हेंबर २०२२ ते २६ जानेवारी २०२३ दरम्यान उद्योग वृध्दी यात्रेचे आयोजन करण्यात येणार असल्याची घोषणा युथ विंगचे चेअरमन व उद्योग वृध्दीचे यात्रेचे मुख्य संयोजक संदिप भंडारी यांनी केली.

वर्ल्ड ट्रेड सेंटर, मुंबई येथे महाराष्ट्र चेंबरच्या ९४ व्या वार्षिक सभेत उद्योग वृध्दी यात्रेच्या बोध चिन्हाचे अनावरण माननीय नारायणजी राणे, उद्योगमंत्री उदयजी सामंत व महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांच्या हस्ते करण्यात आले.

महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी स्वागत केले व महाराष्ट्र चेंबरच्या कार्याची माहिती दिली.

युथ विंगचे चेअरमन संदिप भंडारी यांनी महाराष्ट्र चेंबरचे संस्थापक अध्यक्ष शेठ वालचंद यांच्या जयंती दिनापासून दि. २३ नोव्हेंबर २०२२ ते २६ जानेवारी २०२३ प्रजासत्ताक दिनापर्यंत राज्यात उद्योग वृध्दी यात्रेचे आयोजन करण्यात येत असल्याची घोषणा केली. उद्योग वृध्दी यात्रेची सुरूवात कोल्हापूर येथून होऊन सांगता पुणे येथे होईल. महाराष्ट्र चेंबर व केंद्रिय सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योग मंत्रालय, महाराष्ट्र शासनाचा उद्योग विभाग संयुक्त विद्यमाने यात्रा आयोजित करण्यात आली असून यात्रेत प्रत्येक जिल्हयात तेथील तरूण, नवउद्योजक यांना व्यापार उद्योग करण्यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या असलेल्या विविध योजना, बँकांच्या योजनांची माहिती देणे, व्यापार उद्योग करण्यासाठी प्रोत्साहित करणे व मार्गदर्शन करण्यात येणार आहे. व्यापार उद्योगांच्या नवीन संधीची उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न असणार आहे. तसेच केंद्र व राज्य सरकारच्या एमआयडीसी, एमएसएमई, जिल्हा उद्योग केंद्र व संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत व्यापारी व उद्योजकांच्या असलेल्या अडचणी व समस्या सोडविण्यात येणार आहे. तसेच जॉब फेअर आयोजित करण्यात येणार असून ५००० तरूणांना रोजगार देण्यात येणार असल्याची माहिती चेअरमन श्री. संदिप भंडारी यांनी दिली.

तसेच महाराष्ट्रातील ६ विभागात यात्रा मार्गक्रमण करणार असल्याचे चेअरमन श्री. संदिप भंडारी यांनी सांगितले.

# मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम

## Chief Minister Employment Generation Scheme

राज्यातील शहरी व ग्रामीण क्षेत्रातील सुशिक्षित युवक युवतींची वाढती संख्या व उद्योग व्यवसाय क्षेत्रात राज्यात विविध क्षेत्रात उपलब्ध होत असलेल्या स्वयंरोजगार व रोजगाराच्या नवीन संधी विचारात घेऊन उद्योजकतेला चालना देणारी व सर्जनशील त्याला कालानुरूप वाव देणारी सर्व समावेशक योजना सुरू करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (PMEGP) या केंद्र शासनाच्या सोय रोजगार प्रोत्साहन योजनेचे मर्यादित उद्दिष्ट होतकरू युवक युवतींचे स्वयंरोजगार उभारणीसाठी प्राप्त होणारे मोठ्या प्रमाणातील प्रस्ताव विचारात घेऊन तसेच राज्याचे नैसर्गिक साधन संपत्ती व अंगभूत क्षमता विचारात घेऊन राज्याची महत्वकांक्षी अशी स्वतंत्र मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (Chief Minister Employment Generation Scheme) योजना २०१९-२० या आर्थिक वर्षापासून राज्यात कार्यान्वित करण्यासाठी शासनाच्या नवीन औद्योगिक धोरण २०१९ मुद्दा क्रमांक ५ व ९.२ (II) नुसार नमूद केल्याप्रमाणे जाहीर करण्यात येत आहे. मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेची ठळक वैशिष्ट्ये पात्रता व अटी कार्यप्रणाली खालील प्रमाणे असेल.

**योजना स्तर -** मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (CMEGP) योजना ही राज्यस्तरीय योजना म्हणून तसेच कार्यक्रमांतर्गत म्हणून (Scheme) अंमलबजावणी करण्यात येईल. राज्यस्तरावर उद्योग विभागाच्या अधिपत्याखालील उद्योग संचालनालय मुंबई हे योजनेचे प्रमुख अमलबजावणी संस्था म्हणून कार्यवाही करते.

**योजनेचे उद्दिष्ट -** राज्यातील युवक युवतींना स्वयंपूर्ण आत्मनिर्भर बनविण्यासाठी त्यांचे स्वय रोजगार प्रकल्प राज्य शासनाच्या आर्थिक सहाय्यातून सुलभतेने स्थापित होऊन पुढील पाच वर्षात सुमारे १ लाख सूक्ष्म, लघु उपक्रम स्थापित होणे व त्या माध्यमातून एकूण १० लाख रोजगार संधी राज्यात उपलब्ध होणे हे प्रमुख उद्दिष्ट आहे. प्रथम वर्ष २०१९-२०२० साठी एकूण १० हजार लाभार्थी घटक उद्दिष्ट ठेवण्यात आलेले आहे.

**उद्दिष्टासाठी संदर्भ -** प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम अंतर्गत जिल्हा निहाय मागील ३ वर्षातील उपलब्ध विचारात घेऊन त्यानुसार समप्रमाणात ग्रामीण व शहरी भागांसाठी जिल्हानिहाय उद्दिष्ट उद्योग संचालनालयाकडून निश्चित करण्यात येईल.

**योजनेअंतर्गत पात्र घटक -** कायदेशीररित्या पात्र असणारे उत्पादन, सेवा, उद्योग, कृषी पूरक व्यवसाय, कृषीवर आधारीत उद्योग, ई-वाहतूक व त्यावर आधारित व्यवसाय, एकाच नाममुद्रेवर (ब्रॅण्ड आधारित संघटित साखळी विक्री केंद्रे, फिरते विक्री केंद्र/खाद्यान्न केंद्र इत्यादी घटक कार्यक्रमातंर्गत पात्र असतील. याविषयी गठीत राज्यस्तरीय संनियंत्रण समिती आवश्यकतेनुसार पात्र व अपात्र घटकांची यादी (Negative list) जाहीर करेल.

१. **लाभार्थी पात्रता** : कार्यक्रमांतर्गत पात्रतेसाठी खालील प्रमाणे अटी राहतील.

अ) वयोमर्यादा - कुठलेही स्थायी उत्पन्न नसलेले स्थानिक रहिवासी यांचे वय १८ वर्षे पूर्ण अधिकतम मर्यादा ४५ वर्ष (अनुसूचित जाती/ जमाती / महिला /अपंग/ माजी सैनिक यांच्यासाठी ५ वर्ष शिथिल) पात्र राहतील.

ब) पात्र मालकी घटक - उपरोक्त प्रमाणे पात्रता धारण करणारे वैयक्तिक मालकी भागीदारी वित्तीय संस्थांनी मान्यता दिलेले बचत गट.

क) शैक्षणिक पात्रता -

१) रुपये दहा लाखावरील प्रकल्पासाठी सातवी उत्तीर्ण

२) रुपये २५ लाखावरील प्रकल्पासाठी दहावी उत्तीर्ण.

ड) एका कुटुंबातील एकाच व्यक्तीस कार्यक्रमाचा लाभ घेता येईल कुटुंबाची व्याख्या ही पती पत्नी अशी असेल इ. अर्जदार व्यक्तीने प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम अथवा तत्सम केंद्र अथवा राज्य शासनाच्या अन्य विभागाकडील महामंडळाकडील अनुदानावर आधारित स्वयंरोजगार योजनेचा लाभ घेतलेला नसावा.

२. **प्रकल्प किंमत** :

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांमध्ये पात्र उद्योग व्यवसाय अंतर्गत प्रकल्प किंमत कमाल मर्यादा सेवा उद्योग तसेच कृषी पूरक उद्योग व्यवसायासाठी रुपये १० लाख व उत्पादन प्रकाराच्या प्रवर्गातील प्रकल्पासाठी प्रकल्प किंमत मर्यादा रुपये ५० लाख राहील.

२.२ प्रकल्प खर्चाचे वर्गीकरण - मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम अंतर्गत प्रकल्प उभारणीच्या खर्च वर्गीकरण पुढील प्रमाणे असेल बँक कर्ज ६० % ते ७५ % अर्जदाराचे स्वभाग भांडवल ५% ते१०% शासनाचे आर्थिक सहाय्य अनुदान स्वरूपात १५ % ते ३५ % प्रवर्गनिहाय व सवर्ग निहाय बँक कर्ज अनुदान (मार्जीन मनी) व घटकांचे स्व गुंतवणुकीचे प्रमाण खालील प्रमाणे राहील.

| घटकांचा प्रवर्ग / प्रभाग | घटकाची स्व गुंतवणूक | देय अनुदान (मार्जिन मनी) | बँक कर्ज | | |
|---|---|---|---|---|---|
| घटकाचा प्रभाग | - | शहरी | ग्रामीण | शहरी | ग्रामीण |
| अनुसुचित जाती/ अनुसूचित जमाती/महिला/ अपंग/माजी सैनिक | ५% | २५% | ३५% | ७०% | ६०% |
| उर्वरीत प्रवर्ग | १०% | १५% | २५% | ७५% | ६५% |

सेवा उद्योग व कृषी पूरक उपक्रमासाठी व उत्पादन प्रकारातील उपक्रमांसाठी प्रकल्प किमती अंतर्गत इमारत खर्च २०% च्या मर्यादित असेल तसेच खेळते भांडवल प्रकल्प खर्चाच्या ३० टक्के मर्यादित असेल.

२.३ योजनेअंतर्गत उद्दिष्ट व तरतूद उपलब्धता - या कार्यक्रमाद्वारे व्यापक रोजगाराच्या संधी निर्माण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात येत असून कार्यक्रम कालावधीत (पुढील पाच वर्षात) एकूण १ लाख घटक स्थापित करण्याचे व सुरुवातीचे वर्ष २०१९-२०२० साठी एकूण

१0हजार घटक (लाभार्थी) उद्दिष्ट असेल. एकूण उद्दिष्टांच्या ३0% उद्दिष्ट महिला प्रवर्गासाठी व २0 टक्के उद्दिष्ट अनुसूचित जाती जमाती प्रवर्गातील उमेदवारांसाठी राखून ठेवण्यात येईल. यासाठी शासनाचे संबंधित विभाग (सामाजिक न्याय व विशेष सहाय्यता विभाग व आदिवासी विभाग) यांच्याकडून उद्दिष्टांच्या प्रमाणात तरतूद उद्योग विभागास उपलब्ध करून दिली जाईल. उर्वरित तरतूद शासनाच्या सर्वसाधारण अर्थसंकल्पीय तरतुदीतून उपलब्ध करण्यात येईल.

३. **नोडल संस्था (प्रमुख अंमलबजावणी संस्था)** - मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम अंमलबजावणीसाठी प्रमुख अंमलबजावणी संस्था (नोडल संस्था) म्हणून उद्योग विभागाच्या अधिपत्याखालील उद्योग संचालनालय, मुंबई असेल.

३.१ कार्यक्रम अंमलबजावणी संस्था - मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम अंतर्गत कार्यक्रम अंमलबजावणी संस्था म्हणून उद्योग विभागाच्या अधिपत्याखालील उद्योग संचालनालयाच्या अंतर्गत कार्यरत जिल्हा उद्योग केंद्र तसेच खादी व ग्राम उद्योग मंडळ यांचे अंतर्गत कार्यरत जिल्हा खादी व ग्रामोद्योग कार्यालय कार्यक्रम अंमलबजावणी संस्था म्हणून कामकाज करतील. ग्रामीण भागासाठी (२0000 लोकसंख्येच्या आतील क्षेत्रासाठी/ गावासाठी) खादी ग्रामोद्योग मंडळ व उर्वरित भागासाठी जिल्हा उद्योग केंद्र हे कार्यक्रम अंमलबजावणी संस्था म्हणून कामकाज करतील.

३.२ सहयोगी संस्था - मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम अंतर्गत बँका नोडल बँक उद्योजकीय प्रशिक्षण संस्था ऑनलाईन प्रक्रियेसाठी सहाय्यभूत संस्था अंमलबजावणी संस्था केंद्र शासनाच्या संस्था यांचे सहाय्य घेण्यात येईल विविध संस्थांचा तपशील व कामकाज पुढील प्रमाणे असेल.

३.२.१ वित्तीय संस्था (बँक) - मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम अंतर्गत कर्ज प्रस्ताव जिल्हा कार्यबल समितीच्या मंजुरीने संबंधित बँकांकडे कर्ज मंजुरीसाठी शिफारस करण्यात येतील. सरकारी बँका तसेच खाजगी क्षेत्रातील शेड्युल बँका येस बँक, एचडीएफसी बँक, आयसीआयसीआय बँक प्रमुख बँका सहयोगी संस्था म्हणून कार्यरत राहतील. सदर बँकांमार्फत जिल्हा कार्यबल समितीकडून शिफारस करण्यात आलेल्या कर्ज प्रस्तावांवर कार्यक्रमाचे निकष विचारात घेऊन कर्ज मंजुरीबाबत निर्णय घेण्यात येईल. अर्ज मंजुरी अंतिम अर्ज प्रस्तावावर कार्यक्रमात निश्चित केलेल्या प्रकल्प किंमतीच्या अनुषंगाने कार्यक्रमातील तरतुदीप्रमाणे राज्य शासनाचे अनुदान (मार्जिन मनी) दावे (क्लेम) संबंधित बँक शाखा सादर करेल. सादर क्लेमची आवश्यक छाननी करून उद्योग संचालनालयाअंतर्गत विशेष CMEGP कक्षामार्फत राज्य शासनाचे अनुदान संबंधित बँक शाखेत नोडल बँकेच्या द्वारे जमा होईल.

३.२.२ महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (MCED) - मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमाची सुलभ अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने कर्ज प्रस्तावापासून अनुदान वितरणापर्यंत सर्व प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने करण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे यासाठी उद्योग संचालनालयाच्या सनियंत्रणाखाली महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (MCED) या संस्थेच्या सहयोगातून उद्योग संचालनालया अंतर्गत विशेष आयटी व समन्वयक कक्ष स्थापन करण्यात येईल सदर कक्षा मार्फत या कार्यक्रमाच्या पोर्टलचे निर्माण देखरेख व दुरुस्ती डेटाबेस व एम आय एस सादरीकरण मार्जिन मनी दावे व ततसंबंधी ताळमेळ राज्यातील सर्व बँक शाखा व नोडल बँक अंमलबजावणी संस्था यांच्यामध्ये समन्वय वेळोवेळी प्रगती अहवाल व आढावा सह नियंत्रण समितींना सादर करणे कामकाज करेल सदर पक्षासाठीचा खर्च योजनेअंतर्गत उपलब्ध तरतुदीच्या अंतर्गत प्रशासकीय कारणांसाठी राखून ठेवण्यात येणाऱ्या (एकूण तरतुदीच्या २ टक्के) प्रमाणे तरतुदीतून अदा करण्यात येईल.

३.२.३ खाली व ग्रामोद्योग आयोग (KVIC) - मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमाच्या धर्तीवर अमलात येत असल्याने प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमासाठी नोडल संस्था म्हणून यशस्वीपणे कामकाज करणारी केंद्र शासनाच्या अतत्यारीतील कार्यरत खादी व ग्रामोद्योग आयोग (घतखउ) या संस्थेचे ऑनलाइन प्रक्रिया पोर्टल व प्रशासकीय कामकाजातील अनुभव विचारात घेऊन (CMEGP) सी संस्था योजनेसाठी मार्गदर्शक संस्था म्हणून सहयोग देईल.

३.२.४ नोडल बँक प्रधानमंत्री रोजगार निर्मिती (NODAL BANK) - प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (PMEGP) अंतर्गत नोडल बँक म्हणून कार्यरत असलेली कार्पोरेशन बँक ही मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (CMEGP) अंतर्गत राज्याची मुख्य समन्वयक बँक (नोडल बँक) म्हणून कामकाज करेल.

३.२.५ प्रशिक्षण संस्था - मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमाच्या उत्कृष्ट उपलब्धीसाठी कर्ज मंजूर झालेल्या उमेदवारांसाठी निवासी उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रम राज्यात उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रम देणाऱ्या महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र अथवा राज्यातील नामवंत संस्थांच्या सहयोगाने आयोजित करण्यात येईल सदर प्रशिक्षण उत्पादन वर्ग प्रवर्गातील उद्योग घटकांसाठी दोन आठवडे मुदतीचे व सेवा व कृषी पूरक उद्योगांसाठी एक आठवडा मुदतीचे असेल.

४. अर्ज प्रक्रिया व प्रकल्प मंजुरी अंतर्गत कार्यवाही - मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमाच्या सुलभ अंमलबजावणीसाठी संपूर्ण प्रक्रियेसाठी ऑनलाइन पद्धतीचा अवलंब करण्यात येईल. यासाठी स्वतंत्र CMEGP पोर्टल विकसित करण्यात येऊन त्याद्वारे कर्ज मागणी प्रस्ताव जिल्हा उद्योग केंद्रास किंवा खादी व ग्राम उद्योग मंडळ (KVIB) संस्थेत सादर करण्यात येतील. महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र यांचे अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय उपसमिती मार्फत अर्जांची छाननी करून पात्र उमेदवारांची सूची तयार करण्यात येईल. पात्र उमेदवारांना समुपदेशनासाठी निमंत्रित करण्यात येऊन त्याद्वारे प्राथमिक निवड यादी जिल्हा उपसमिती मार्फत तयार करण्यात येईल. सदर प्राथमिक यादी जिल्हास्तरीय कार्यवाल समितीद्वारे अंतिम करण्यात येईल. सदर जिल्हा कार्यबल समिती द्वारा अंतिम मंजुरी देण्यात आलेल्या कर्ज प्रस्तावांची शिफारस पुढील मंजुरीसाठी महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र यांच्याकडून संबंधित बँकास सादर करण्यात येईल. ऑनलाइन द्वारा शिफारस करण्यात आलेल्या प्रस्तावांची बँक स्तरावर प्रकल्पाची वित्तीय व्यवहार्यता अनुषंगिक बाबी तपासून बँक कर्ज मंजुरी बाबतचा निर्णय घेईल. प्रस्तावास कर्ज मंजुरी आल्यास मंजुरी संबंधीचा तपशील ऑनलाईन द्वारे बँकेमार्फत महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र यांना सादर करण्यात येईल. अर्ज प्रक्रिया छाननी समुपदेशन बँकेस कर्ज प्रस्तावाची शिफारस कर्ज मंजुरी व प्रक्रिया जिल्हास्तरावर पूर्ण होतील. महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र हे बँकांनी मंजूर केलेला तपशील

यथायोग्य असल्याचे खात्री करून राज्यस्तरीय CMEGP सेल यांना कर्ज वितरण व अनुदान वितरणासाठी प्रस्ताव सादर करतील. उचएत्रझ सेलकडून प्रस्तावाची छाननी होऊन नोडल बँकेच्या मार्फत राज्य शासनाचे मार्जिन मनी अनुदान रक्कम संबंधित बँकांना वितरित करण्यात येईल. मार्जिन मनी रक्कम ही बँक शाखेद्वारा ३ वर्ष कालावधीसाठी संबंधित कर्ज खात्याच्या नावे डिपॉझिट करेल. ३ वर्ष कालावधी पूर्ण झाल्यानंतर जिल्हा समितीच्या मान्यतेने राज्य शासनाचे मार्जिन मनी अनुदान संबंधित कर्ज खात्यावर जमा होईल.

५. **निवासी उद्योजकता** - प्रशिक्षण मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमाच्या अंतर्गत उत्कृष्ट उपलब्ध होण्याच्या दृष्टीने अर्ज प्रस्ताव मंजूर झालेल्या प्रकरणांमध्ये लाभार्थींचे दोन आठवडे कालावधीचे निवासी उद्योजकीय प्रशिक्षण अनिवार्य असून यशस्वीरित्या प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या अर्जदारांनाच कर्ज वितरण व अनुदान सहाय्य वितरणासाठी पात्र ठरविण्यात येईल सदर प्रशिक्षणासाठीचा खर्च CMEGP योजनेसाठी उपलब्ध करण्यात आलेल्या तरतुदीतून करण्यात येईल. एकूण तरतुदीच्या पाच टक्के इतकी रक्कम प्रशिक्षण कार्यक्रमासाठी राखून ठेवण्यात येईल सदर प्रशिक्षण कार्यक्रमाची अंमलबजावणी उद्योजकीय प्रशिक्षणात कार्यरत असणाऱ्या राज्य पुरस्कृत संस्था महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र तसेच राज्यस्तरीयसनियंत्रण समितीने मान्यता दिलेल्या राज्यातील इतर नामवंत संस्थामार्फत आयोजित करण्यात येईल.

## ६. योजना अंमलबजावणी समन्वय व संनियंत्रण

६.१ जिल्हास्तरीय आढावा व उप समन्वय समिती - (District Level Review and Co-ordination Committee (DLRCC)) जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम अंतर्गत कार्यवाहीचा आढावा व समन्वय यासाठी समिती गठित करण्यात येईल. सदर समितीचे सदस्य सचिव म्हणून महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र हे असतील सदर समितीच्या सहाय्यासाठी अर्जांची छाननी अंतिम निवड व प्रशासकीय आवश्यक कार्यवाहीसाठी जिल्हास्तरीय छाननी व समन्वय उपसमिती स्थापित करण्यात येईल सदर जिल्हास्तरीय समिती यांची रचना खालील प्रमाणे आहे.

६.२ जिल्हास्तरीय छाननी व समन्वय उपसमिती- (District Level Scrutiny and Co-ordination Sub-committee (DLSCC)) मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम अंतर्गत प्राप्त अर्जांची छाननी अर्जदारांचे समुपदेशन व बँकांना कर्ज प्रस्ताव शिफारस करणे तसेच मंजूर कर्ज प्रकरणांतर्गत मार्जिन मनी अनुदान रक्कम संबंधित लाभार्थी यांना उपलब्ध होण्यासाठी व आवश्यक प्रशासकीय कार्यवाहीसाठी महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय छाननी समिती कामकाज करेल.

| अ. क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र | अध्यक्ष |
| २ | जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक | सदस्य |
| ३ | जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी | सदस्य |
| ४ | जिल्हा समन्वयक, महिला आर्थिक विकास महामंडळ | सदस्य |
| ५ | सहायक आयुक्त, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | सदस्य |
| ६ | प्रकल्प अधिकारी, आदिवासी विकास विभाग | सदस्य |
| ७ | जिल्ह्यातील दोन प्रमुख प्रतिनिधी | सदस्य |
| ८ | जिल्ह्यातील दोन प्रमुख औद्योगिक संघटना/संस्था/औद्योगिक समूह प्रतिनिधी | सदस्य |
| ९ | व्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र | सदस्य सचिव |

**समितीचे कार्य -**

१. ऑन-लाईनद्वारे प्राप्त अर्जांची, कागदपत्राची आवश्यक छाननी करून समुपदेशनासाठी संकिर्ण यादी तयार करावे.

२. अर्जदाराचे समुपदेशन करणे.

३. पात्र अर्जदारांचे कर्ज प्रस्ताव जिल्हास्तरीय कार्यबल समितीच्या मान्यतेने संबंधित बँकास कर्ज मंजूरीसाठी शिफारस करणे.

४. बँकाकडून सादर करण्यात येणारे कर्ज मंजूरी प्रस्ताव तपासून त्याअंतर्गत प्रकल्प किंमत व मार्जिन मनी अनुदान क्लेम आवश्यक छाननी अंती उद्योग संचालनालयास शिफारस करणे.

५. अनुदान ताळमेळ, नोंदी, सर्व जिल्हा स्तरावरील बँका व अंमलबजावणी संस्था, प्रशिक्षण संस्था यांचेकडे समन्वय साधून आवश्यक सूचना देणे.

६.३ जिल्हास्तरीय कार्यबल समिती (District Level Task Force Committee (DLTFC)) जिल्हास्तरीय संनियंत्रणासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय कार्यबल समिती गठीत करण्यात येईल.

| अ. क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २ | जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक | सदस्य |
| ३ | जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी | सदस्य |
| ४ | जिल्हा समन्वयक, महिला आर्थिक विकास महामंडळ | सदस्य |
| ५ | सहायक आयुक्त, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | सदस्य |
| ६ | प्रकल्प अधिकारी, आदिवासी विकास विभाग | सदस्य |
| ७ | महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र | सदस्य सचिव |

**समितीचे कार्य**

१. प्रवर्गनिहाय उद्दिष्ट पूर्ण होण्यासाठी छाननी समितीकडून सादर झालेले पात्र अर्ज बँकेकडे पाठवण्याकरिता शिफारस करणे.

२. जिल्हास्तरावरील सर्व यंत्रणांच्या समन्वयाने सुलभ अंमलबजावणी व उद्दिष्ट साधण्यासाठी आवश्यक कार्यवाही करणे.

३. मार्जिन मनी दावा (MMClaim) प्रतिपूर्ती करून अंतिम समायोजनेसाठी (Settelment) कार्यवाही व शिफारस करणे.

४. जिल्हास्तरीय छाननी व उप समन्वय उपसमिती अंतर्गत दोन प्रमुख

बँक प्रतिनिधी तसेच दोन प्रमुख औद्योगिक संघटना संस्था औद्योगिक समूहांचे प्रतिनिधी निवडणे.

५. कार्यक्रमाच्या उत्कृष्ट उपलब्धीसाठी वेळोवेळी आढावा घेणे व संबंधित संस्थांना आवश्यक सूचना देणे.

**७. राज्यस्तरीय संनियंत्रण -** मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम हा राज्यातील युवक युवतींना आत्मनिर्भर बनविणारे महत्त्वपूर्ण कार्यक्रम असून सुलभ अंमलबजावणीसाठी राज्य स्तरावर खालील प्रमाणे नमूद समित्या गठित करण्यात येत आहे

७.१ सनियंत्रण समिती - मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम अंतर्गत नियमित आढावा व समन्वयासाठी विकास आयुक्त उद्योग यांच्या अध्यक्षतेखालीच राज्यस्तरीय संनियंत्रण समिती गठित करण्यात येईल. सदर समितीची कार्यकक्षा खालील प्रमाणे असेल.

- योजनेचा नियमित रहिवासी काढावा घेणे व आवश्यक सूचना करणे.
- वार्षिक उद्दिष्ट मूर्तीसाठी सर्व संबंधित विभाग बँक यांच्याकडे समन्वय साधून योजनेच्या सुलभ अंमलबजावणीसाठी कृती आराखडा तयार करणे.
- योजनेच्या उत्कृष्ट फलनिष्पत्तीसाठी आवश्यक कार्यवाही व मार्गदर्शन करणे.
- योजनेअंतर्गत पात्र व अपात्र घटकांची वेळोवेळी यादी निश्चित करणे.
- योजनेअंतर्गत सर्व प्रक्रिया विहित कालावधीत होण्यासाठी जास्तीत जास्त माहिती तंत्रज्ञानाचा वापर होण्यासाठी किमान मानवी हस्तक्षेप राहण्यासाठी उपाययोजना करणे.

सदर नियंत्रण समितीची रचना खालील प्रमाणे असेल.

| अ. क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | विकास आयुक्त (उद्योग) | अध्यक्ष |
| २ | मुख्य कार्यकारी अधिकारी, खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई | सहअध्यक्ष |
| ३ | राज्य संचालक, खादी व ग्रामोद्योग आयोग,मुंबई | सदस्य |
| ४ | आयुक्त,महिला व बालकल्याण विभाग, मुंबई | सदस्य |
| ५ | आयुक्त, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | सदस्य |
| ६ | आयुक्त, आदिवासी विकास विभाग | सदस्य |
| ७ | राज्य समन्वयक, बँक ऑफ महाराष्ट्र (राज्य अग्रणी बँक) | सदस्य |
| ८ | महाव्यवस्थापक, महाराष्ट्र मंडल, कार्पो रेशन बँक | सदस्य |
| ९ | उप.अध्यक्ष, येस बँक | सदस्य |
| १० | आवश्यकतेनुसार खाजगी बँक व राष्ट्रीयकृत बँक प्रतिनिधी | सदस्य |
| ११ | कार्यकारी संचालक, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र | सदस्य |
| १२ | अतिरिक्त उद्योग संचालक, उद्योग संचालनालय, मुंबई | सदस्य सचिव |

७.२ उच्चस्तरीय सुकाणू समिती - मा. मुख्य सचिव महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय उच्चस्तरीय सुकाणू समिती गठीत करण्यात येईल. समितीचे कार्य कक्षा खालील प्रमाणे असेल.

- मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमाच्या सुलभतेने व प्रभावीपणे अंमलबजावणी होण्यासाठी राज्यस्तरीय बँक अधिकारी व अंमलबजावणी संस्था यांचा आढावा घेणे व आवश्यक सूचना देणे.
- कार्यक्रमाच्या उद्दिष्टे उपलब्धीसाठी उत्कृष्ट फलनिष्पत्तीसाठी मार्गदर्शन करणे
- कार्यक्रमासाठी राज्याची आर्थिक तरतूद व संबंधित विभाग यांना आवश्यक सूचना करणे.
- कार्यक्रमाच्या प्रभावी अमलबजावणीसाठी कार्यक्रमांतर्गत तरतुदीत आवश्यक बदल करणे विविध विभागांकडून आवश्यक असणाऱ्या पूर्ततांसाठी आवश्यक सूचना संबंधित विभागांना करणे.

(सदर समितीची रचना पुढील प्रमाणे असेल.)

**मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम उच्चस्तरीय सुकाणू समिती.**

| अ. क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य | अध्यक्ष |
| २ | सचिव, वित्त विभाग | सदस्य |
| ३ | सचिव (उद्योग) | सदस्य |
| ४ | सचिव, सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग | सदस्य |
| ५ | सचिव, आदिवासी विकास विभाग | सदस्य |
| ६ | सचिव, महिला व बालकल्याण विभाग | सदस्य |
| ७ | व्यवस्थापकीय संचालक, राज्य अग्रणी बँक (बँक ऑफ महाराष्ट्र) | सदस्य |
| ८ | व्यवस्थापकीय संचालक, कार्पोरेशन बँक (नोडल बँक) | सदस्य |
| ९ | खाजगी बँक (दोन) | सदस्य |
| १० | इतर राष्ट्रीयकृत बँक (स्टेट बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ इंडिया आणि बँक ऑफ बडोदा) (तीन) | सदस्य |
| ११ | राज्य समन्वयक, राज्य अग्रणी बँक (बँक ऑफ महाराष्ट्र) | सदस्य |
| १२ | विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, मुंबई | सदस्य सचिव |

७.३ राज्य शासनाच्या उद्योग विभागाकडून उच्च उच्चस्तरीय सुकाणू समिती व संनियंत्रण समितीवर राष्ट्रीयकृत बँक खाजगी बँकांचे प्रतिनिधी नियुक्तीची करण्यात येईल.

**लेखाशीर्ष -** प्रस्तुत कार्यक्रम नवीन असल्याने नवीन लेखाशीर्ष उघडल्यानंतर या नवीन लेखाशीर्ष अंतर्गत सदर कार्यक्रमाचा खर्च टाकण्यात येईल नवीन लेखाशीर्ष बाबतचा शासन निर्णय स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येईल.




# स्टार्टअप मधुन लाखो रोजगार निर्माण होतील

**विश्वजीत ठकार**, पुणे
मो. : ९४२३१८८६१८

फॉक्सकॉम नावाची एक कंपनी महाराष्ट्रातून उठून गुजरातला गेली आणि मोठा गहजब झाला. कारण लाख-सव्वा लाख रोजगार निर्माण करू शकतील अशा कंपन्या थोड्याच असतात.

जागतिकीकरणानंतरच्या या काळात सर्व देश परकीय गुंतवणूकीतून विकास हा मंत्र आळवत आहेत. चीनने स्पेशल इकॉनॉमिक झोनची संकल्पना प्रथम राबवली. जगाची फॅक्टरी म्हणून ते पुढे आले आणि हुरळली मेंढी चालली लांडग्याच्या पाठोपाठ या प्रकारे सारे जगच स्पेशल इकॉनॉमिक झोन, फॉरेन इन्व्हेस्टमेंट असे शब्द तिळा दार उघड प्रमाणे म्हणून लागले.

२ ऑक्टोबरपासून सुरू होणाऱ्या आठवड्यात तरी आपण महात्मा गांधींचे विचार आठवू यात. बेरोजगारी आणि महागाई हे आपल्या समोरचे दोन मोठे प्रश्न आहेत आणि हे दोन्ही प्रश्न मुख्यत: मोठमोठ्या कंपन्यांच्या कारभारामुळे निर्माण झाले आहेत. कमीत कमी कामगार रोजगारावर ठेवावेत, त्यांना कायदेशीरपणे पण कमीत कमी पेमेंट करावे यासाठी यांत्रिकीकरण, कॉम्प्युटरायजेशन, रोबो, ड्रोन वगैरे तंत्रज्ञान ते वापरतात. तसेच कंत्राटी कामगार ठेवून पळवाटा वापरतात. महागाईच्या बाबतीत म्हणाल तर मार्केटिंगचे एकेक फंडे वापरून गरज नसणाऱ्या वस्तूंची विक्री ते वाढवत असतात. तशात आताच्या या काळात आर्थिक विषमता प्रचंड वाढली आहे. आता बिलीयनॉयरच्या जागेवर ट्रिलियन जागेवर ट्रिलियनायर येऊ लागले आहेत. अर्थातच बेरोजगारी आणि महागाई वाढतच जाणार.

महात्मा गांधींनी त्या काळात औद्योगिकीकरणाच्या या बाबींचा अभ्यास करून खादी ग्रामोद्योगाचा मार्ग दाखवून दिला होता. मास प्रोडक्शन नव्हे तर प्रोडक्शन बाय मासेस असा हा वेगळा विचार.

दुसऱ्या महायुध्दाच्या काळात महागाई वाढली. विशेषत: अन्नातील प्रथिनांच्या किंमती वाढल्या. कुपोषणाचा प्रश्न सोडवण्यासाठी सोयाबीन उपयुक्त ठरेल हे लक्षात घेऊन त्यांनी सोयाबीनला सोन्याचा दाणा म्हटले होतो.

आताच्या काळात भारतात दरसाल बारा हजार दशलक्ष टन एवढे सोयाबिनचे प्रचंड उत्पादन होते. मात्र त्यापैकी फारच थोडे सोयाबिन माणसाचे अन्न म्हणून वापरले जाते. साधारणपणे प्रत्येक व्यक्तीने रोजच्या आहारात पंचवीस ते पन्नास ग्रॅम सोयाबिन वापरले तर देशातील जनतेचा कुपोषणाचा प्रश्न सुटेल. अर्थातच येथे स्टार्टअप उद्योगांना अनेक संधी आहेत.

आम्ही व्हिवा फुडस् या ग्रामोद्योगाच्या माध्यमातून गेली पाच वर्षे सोयाबीनच्या खाद्यपदार्थ तसेच इतर हेल्थ फुडस्चे उत्पादन करतो व ऑनलाईन विकतो. आत्तापर्यंत आम्ही पंचवीसहून जास्त सोया पदार्थ विकसित केले आहेत. आमच्या अनुभव अनेक उद्योजक उद्योजिकांना मार्गदर्शक ठरेल.

पौष्टिक आहार, विशेषत: सोयाबीन प्रक्रिया हा व्यापारी यश मिळवण्याच्या दृष्टीने अत्यंत ट्रिकी उद्योग आहे. यशस्वी होण्यासाठी काही मुलभूत विचार येथे मांडत आहे.

करके देखो मतामतांच्या गलबल्यामध्ये आपण महात्मा गांधींचा करके देखो हा मंत्र प्रथम आचारावा. आताच्या या काळात सोयाबीनचे दूध आणि पनीर (टोफू) ची यंत्रे बनवणाऱ्या कंपन्या पुढे आल्या आहेत पण बाजारात सोयाबिनचे दूध गाई म्हशीच्या दूधाप्रमाणे विकले जाताना दिसत नाही. आपण घरोघरी प्रेशर कूकरचा वापर करून सुध्दा सोयाबिनचे दुध बनवू शकतो. हे दूध पौष्टिक असते पण त्याची चव चहाला चालत नाही.

बाजारात सोयाबिनचे दुध टेट्रा पॅकमध्ये फ्लेवर्ड दुध म्हणून चांगले विकले जाते. हजारो उद्योजक सोयाबिनच्या दुधाची पावडर वापरून मिक्सरने त्याच चवीचे फ्लेवर्ड दुध बनवू शकतात. तसेच फ्रेश होममेड सोयामिल्क म्हणून विकूही शकतात.

# महाराष्ट्रातील बंदरे





**श्री. अभय कुंडलिया**
चेअरमन, पोर्ट डेव्हलपमेंट अ‍ॅण्ड लॉजिस्टिकस कमिटी, MACCIA

महाराष्ट्रातील बंदरे एकेकाळी जागतिक व्यापाराची महत्त्वाची केंद्रे होती, असा इतिहास आपण नेहमी वाचतो. शिवाजी महाराजांनी तर अरबी समुद्रात अत्यंत कठीण असे जलदुर्ग बांधून मराठी आरमारही भक्कम केले होते. या आरमाराने केवळ सिद्दीलाच नव्हे, तर युरोपीय आरमारालाही जोरदार टक्कर दिली. पेशवाईत तर कोकणातील बंदरांतून थेट सौदी अरेबियाशी व्यापार चालू होता. महाराष्ट्राचे स्वतंत्र राज्य झाल्यानंतर लगेच म्हणजे १९६३ मध्ये बंदरांसाठी स्वतंत्र विभाग स्थापन झाला. महाराष्ट्राला ७२० कि. मी. लांबीची किनारपट्टी लाभलेली आहे. मुंबई उपनगर आणि मुंबई जिल्ह्यात अंदाजे ११४ कि.मी., ठाणे व पालघर जिल्हा मिळून १२७, रायगड जिल्ह्याला १२२ कि.मी., रत्नागिरी जिल्ह्याला २३७ कि.मी., तर सिंधुदुर्ग जिल्ह्याला १२० कि.मी.ची किनारपट्टी आहे. या ४८ बंदरांवर राज्य शासनाकडून विविध विकास कामे महाराष्ट्र सागरी मंडळाकडून केली जात असून ५२ दशलक्ष टनापेक्षा अधिक मालवाहक कामे केली असल्याची माहिती दिली. बाकीच्या ४८ लहान व मध्यम बंदरांचे पाच गट राज्य सरकारने केले आणि त्यावर एकेक अधिकारी नेमला. पण बंदर विकासाच्या दृष्टीने फारशी प्रगती झाली नाही. १९९०मध्ये केंद्र व राज्य सरकारला जाग आली आणि दोन्ही पातळ्यांवर प्रथमच मोठ्या प्रमाणात काम सुरू झाले. राज्य सरकारने १९९० मध्ये बंदरआयुक्तांची नियुक्ती केली. पाठोपाठ १९९६ मध्ये बंदर विकासासाठी 'महाराष्ट्र मेरि टाइम बोर्ड' (एमएमबी) स्थापन करण्यात आले. बंदर मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली या बोर्डाने आपले काम सुरू केले.

केंद्र सरकारने अलीकडे देशातील महत्त्वाच्या बंदरांच्या विकासाचा कार्यक्रम हाती घेतला आणि त्यासाठी खासगी उद्योगांचे सहकार्य घेण्यास सुरुवात केली. आंतरराष्ट्रीय सागरी व्यापार हवाई वाहतुकीमुळे कमी झालेला नसून उलट वेगाने वाढतोच आहे. दोन दशकांत या व्यापारात गोद्यांमध्ये आणि तेथील अत्याधुनिक यंत्रणांमध्ये जगभर क्रांतिकारक बदल झाले आहेत. के बदल भारतीय बंदरांत तेवढ्याच गतीने घडून न आल्याने भारतीय बंदरे आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या अत्यंत मोक्याच्या ठिकाणी असूनही व्यापारातील आपला वाटा कमी होत गेला. म्हणूनच ही परिस्थिती तातडीने सावरण्यासाठी केंद्राने जलद पावले उचलली. त्याचाच पाठपुरावा करत महाराष्ट्र सरकारने गेल्या जुलैमध्ये 'ग्रीन फील्ड पोर्ट पॉलिसी' मंजूर केली. त्यामुळे महाराष्ट्रातील बंदर विकासही आता वेगवान होणे शक्य झाले आहे.

छोट्या बंदरांवर पुढील पाच वर्षांत २२ हजार ७७५ कोटी रुपये खर्च करण्यात येणार असून या बंदरांतील कार्गो हाताळण्याची क्षमता सन २०१५ पर्यंत २५४ दशलक्ष टन एवढी वाढवण्यात येणार आहे. एमएमबी हीच संस्था या सर्व विकासाचे संचालन करणार आहे. महाराष्ट्राच्या नव्या धोरणात दोन गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. पहिली म्हणजे बंदराला प्रथमच उद्योगाचा दर्जा देण्यात आला आहे. त्याबरोबरच खासगी उद्योगाच्या सहकार्याने हा बंदर विकास घडवला जाणार आहे. त्यासाठी सरकारने नवे बूस्ट (इडडरळ) मॉडेल स्वीकारले आहे. यात बांधणे, मालकी, वापरणे, सहयोग आणि हस्तांतर यांचा समावेश आहे. या तत्त्वानुसार बंदरविकास लवकर व्हावा म्हणून विकासकांना पुढील ५० वर्षे विविध प्रकारच्या सवलती मिळणार आहेत.

भारतात बंदर विकासामध्ये सर्वात मोठी अडचण निधीच्या उपलब्धतेची होती. सरकारजवळ पुरेसा निधी नसल्यामुळेच खासगी विकासकांना सहकार्यासाठी आमंत्रित केले गेले आहे. या कामासाठी ज्या स्वतंत्र कंपन्या खासगी उद्योग स्थापन करतील, त्यामध्ये सरकारचेही ११ टक्के भांडवल असेल. त्याबरोबरच जमीन खोदाई, वीज-कर, नोंदणी, स्टॅम्प ड्यूटी यावरील सवलतींचे खास पॅकेजही दिले जाणार आहे. वीज आणि पाणी यांचा अखंड पुरवठा मिळण्याचा अधिकार ही या कंपन्यांना मिळेल. बंदर विकास करताना आणि त्यासंबंधीच्या नव्या सोयी उभ्या करताना बंदराच्या जवळपासची जमीन ताब्यात घ्यावी लागणार आहे. हे काम सरकारने विकासकांवरच सोपवले असले तरी आवश्यक तेथे एमएमबी जमीन ताब्यात घेऊन देईल. बंदरांचा विकास करत असतानाच त्याचा संबंध अंतर्गत भागातील चांगल्या दळणवळणाशीही असतो. सुदैवाने कोकणात मुंबई-गोवा महामार्ग, कोकण रेल्वे या महत्त्वाच्या सुविधा उपलब्ध आहेत. पण बंदरांपासून या महामार्गापर्यंत आणि रेल्वे स्थानकापर्यंत मालाची सहजने-आण करता येईल असे रस्ते मात्र नाहीत. असे रस्ते बांधण्याचे कामही सरकारने विकासकांवरच सोपवले आहे. त्यावर होणारा खर्च टोलद्वारे परत घेण्याची परवानगीही दिली आहे. साहजिकच बंदरांच्या विकासाबरोबर या संपूर्ण किनारपट्टीवर अत्याधुनिक रस्त्यांचे जाळे उभे राहणे शक्य झाले आहे. कोणताही प्रकल्प उभा करत असताना पर्यायी जमीन देण्याबरोबरच विस्थापितांच्या पुनर्वसनात दोन महत्त्वाचे मुद्दे असतात. त्याभागात उभ्या राहणा-या प्रकल्पात स्थानिक तरुणांना काम करता येईल असे प्रशिक्षण आणि रोजगार द्यावा लागतो. त्याबरोबरच इतरही साधन सुविधा स्थानिकांना उपलब्ध करून द्याव्या लागतात. बंदर विकासाचे नवे धोरण किनारपट्टीवरील समाजजीवन उजळून टाकणारे ठरेल यात शंका नाही.

# Role of District Industries Centers & various Schemes

Directorate of Industries, Govt. of Maharashtra (GoM) is an executive arm of the Industries Department of Government of Maharashtra and is engaged in implementation of government policies for all round development of industries in the state by seeking coordination amongst the state level promotional corporations like MIDC, MSSIDC, KVIB etc. and other department of the government relating to industries.

The Directorate of Industries has been established to monitor, implement and develop various schemes including Incentive Schemes for promotion of industries in Maharashtra. It also assists the State Government in the formulation of various industry related policies and promotional schemes viz. Industrial policy, SEZ policy, IT Policy, Package Scheme of Incentives etc.

The Directorate of Industries implements various schemes and incentives for promotion of industries in Maharashtra. Most notable among all the schemes is the Package Scheme of Incentives 2013, the latest one announced along with the latest Industrial Policy 2013 of the State.

The Directorate is supported by six Regional Offices, a sub regional office at Nanded and DIC (District Industries Center) at every district. The powers to implement the schemes are decentralised to maximum extent and are vested with the DIC for effective delivery mechanism at district level.

### Role of District Industries Centres (DICs)

The Directorate of Industries implement, develop and monitor various schemes and impart incentives for promotion of industries in Maharashtra. It also assists the State Government in the formulation of various industry related policies and promotional schemes viz. Industrial policy, SEZ policy, IT Policy, Package Scheme of Incentives etc. Provide assistance for DIC programmes

- Single window clearance system
- Promote industries in rural areas
- Provide employment to people in both rural and urban areas

### Organization Structure




### Schemes under the District Industries Centres (DICs)

A number of schemes have been launched which fall under the ambit of District Industries Centres (DICs). These schemes help in fulfilling the goals of establishing the District Industries Centres (DICs). These schemes are centrally sponsored schemes as well as central sector schemes. The following schemes fall under the DIC:-

- **Prime Minister's Employment Guarantee Program (PMEGP) :** This centrally sponsored scheme under the Ministry of Micro, Small and Medium Enterprises (MSME) was launched in 2008. The PMEGP aims to generate employment opportunities for educated unemployed citizens in rural and urban areas. The nodal agency for the implementation of the scheme is Khadi & Village Industries Commission (KVIC). Under this scheme, 90-95% of the amount will be given by banks as loans with 5-10% of the project cost in the industry, service or business sector being the applicant's share.
- **District Industries Centre (DIC) Loan Scheme:** This scheme is for the self-employed as well as the small unit sector in towns and rural areas with population less than 1 lakh and with capital investment being less than Rs. 2 lakhs. These small units are identified by the Small Scale Industries Board and Village industries, handicrafts, handlooms, silk& coir industries.

  For entrepreneurs in the general category, 20% of the total investment or Rs. 40,000 shall be the margin money (whichever is lesser). For entrepreneurs in the SC/ST category, 30% of the total investment or Rs. 60,000 shall be the margin money (whichever is lesser).
- **Seed Money Scheme:** This scheme is targeted towards the self-employed who engage in skilled wage employment or

self-employment ventures. Institutional financial assistance in the form of soft loans. Project cost to avail loan facility under the seed money scheme has been increased to Rs. 25 lakhs. For projects up to Rs. 10 lakhs, seed money assistance of up to 15% of the project cost is offered. For SC/ST/OBC, the assistance provided will be 20% of the project cost; the limit of assistance provided is Rs. 3.75 lakhs with 75% of the project cost being in the form of a bank loan.

- **District Awards Scheme :** To boost entrepreneurs' spirits and celebrate their achievements and successes, the state governments have started honoring such entrepreneurs with awards at the district level. The District Advisory Committee formed at the district level shall select the entrepreneurs to be awarded. The District Awards Function is held on Vishwakarma Jayanti Day which falls on varying dates every year. The award function includes the display of the products by the entrepreneur for sale and exhibition along with workshops and discussion about the same.
- **Entrepreneurship Development Training Programme :** This scheme was launched to impart training to the educated unemployed people and encourage them to encourage self-employment ventures or engage in skilled wage employment. Training programmes under the Entrepreneurship Development Training Programme are:
  - o Entrepreneurship Introductory Programme (UdyojakataParichayKaryakram)
  - o Entrepreneurship Development Training Programme (12 Day residential)
  - o Technical Training Programme (12 Days to 2 Months non-residential)

**Eligibility Criteria For Applying Under the District Industries Centres (DICs)**

Loan facility under the District Industries Centres (DICs) can be availed under the various schemes mentioned above. These schemes are promoted and implemented by the District Industries Centres (DICs) and loans can be availed under different schemes with varying eligibility criteria.

**Functions of District Industries Centres (DICs)**

Various important functions are performed by the District Industries Centres (DICs) for the upliftment of a district and to put that district on the industrial map of India. Some of the functions performed by the District Industries Centres (DICs) are mentioned below:-

- Preparation of industrial profile of the district – This helps in identifying the pros and cons concerning setting up different industries in the district in consonance with the availability of infrastructure, raw materials, labor and land in the area.
- **Assist entrepreneurs in obtaining licenses** – To set up an industrial unit, various types of licenses are required- electricity board, no-objection certificate, water supply board, etc. These licenses are facilitated by the District Industries Centres (DICs), making it easier for entrepreneurs to set up industrial units in the respective district.
- **Acting as the focal point of industrialization of the district –** To make strides in the arena of industrialization, the District Industries Centres (DICs) act as the focal point. From providing various clearances and licenses to facilitating loans and granting awards, the District Industries Centres (DICs) do it all.
- **Opportunity guidance of entrepreneurs –** Lack of knowledge about an existing opportunity does more damage than the lack of opportunity. District Industries Centres (DICs) help in bringing to the fore various opportunities to help entrepreneurs. This helps in generating employment opportunities in addition to the industrialization of the district.
- **Manpower assessment concerning skilled, semi-skilled labour** – District Industries Centres (DICs) help in making optimum use of its platform to identify the labour that is best fit for the respective market. This helps avoid under-employment.
- **Identify infrastructure facilities** – For any area to develop, infrastructure facilities are a top priority for identifying the potential that can be tapped from a certain area. Facilities such as electricity, roads, warehouses, banking, quality testing facilities etc are identified by the District Industries Centres (DICs).
- **Prepare techno-economic feasibility report –** The District Industries Centres (DICs) prepare the techno-economic feasibility report that analyzes the performance of an industrial product, process, or service to improve areas in need of it.
- **Advise entrepreneurs on investments made** – The District Industries Centres (DICs) advise entrepreneurs on the various investments which they seek to make. In this manner, they provide consultancy services that help entrepreneurs in making better decisions with respect to their investments.

# National Logistics Policy 2022 - The Unveiling of a new era in logistics





**Mr. Karunakar Shetty**
Vice President, MACCIA

The good news is that with the National Logistics Policy (NLP) the logistics stands to be an organized sector with this policy being abiding force to the sector.

I am sure in the coming few years we can foresee our country competing amongst top 10 in Logistics Performance Index. This policy will help make the sector an integrated, cost efficient, and sustainable logistics eco system in the country as it aims in streamlining the rules and addressing the supply side constraints.

This policy aims at boosting the various government initiatives like PM Gathi Shakti, Sagarmala project etc. which can distinctively help us in competing globally cutting down the logistics cost and building the world class infrastructure. Currently, the logistics cost to GDP of our country is around 15% much higher as compared to other developed countries.

With this policy government will aim to reduce the logistics cost to single digit. Also, when comparing to world class port facilities our country will get major boost due to this policy. Collectively this policy will help us in designing the India where a major focus will be on increasing the exports, creating a competitive domestic market, compliment the initiatives like Make in India. This will help our GDP flourish and create a road map for achieving our Hon. Prime Ministers aim of 5 trillion-dollar economy.

**What is National Logistics Policy (NLP) 2022**

- The National Logistics policy (NLP) 2022 is a comprehensive effort to address cost and inefficiency by issues lying down an overarching interdisciplinary, cross-sectoral, and multi - jurisdictional framework for developing the entire logistics ecosystem.
- NLP was made for quick last-mile delivery, ending transport-related issues, saving manufacturers time and money, and preventing wasting of agricultural products.
- The NLP aims to promote seamless movement of goods and enhances the competitiveness of Indian industries.

**Vision and Mission :** The policy will create a single window e-logistics market and focus on the generation of employment, and skills and make MSMEs competitive.All this will augment the economy in various ways like employment generation, inter-state, and international exchange of goods. This policy move will bring India closer to becoming a global manufacturing powerhouse and pave its way to becoming a logistics hub.

**Goals of NLP:**

- The policy aims to lower the cost of logistics and lead it to par with other developed countries.
- The goal of this policy is to make the logistics industry more efficient and lower its costs and

small businesses and the people who work in them gain profit.

- The strategy aims to boost economic growth, provide employment opportunities, and make Indian products more competitive in the global market.
- To create a modern infrastructure of a world-class standard by including all relevant stakeholders in the process of holistic planning and implementation.
- The government's latest policy comes with a Comprehensive Logistics Action Plan (CLAP) which details the NLP's specific targets which includes reducing India's logistics cost to be comparable to global benchmarks by 2030 and aiming to be among the top 25 countries by 2030 in the Logistics Performance Index (LPI).

### Present condition of Indian logistics sector :

- India's logistics sector is very complex with more than 20 government agencies, 40 PGAs, 37 export promotion councils, 500 certifications, 10000 commodities, 160 billion market size. It also involves 12 million employment bases, 200 shipping agencies, 36 logistics services, 129 ICDs, 168 CFSs, 50 IT ecosystems and banks & insurance agencies. Further, 81 authorities and 500 certificates are required for EXIM.
- The Indian logistics sector provides livelihood to more than 22 million people and improving the sector will facilitate 10 % decrease in indirect logistics costs leading to the growth of 5 to 8% in exports.
- Further, it is estimated that the worth of the Indian logistics market will be around USD 215 billion in the next two years compared to about USD 160 billion at present.
- Investment Information and Credit Rating Agency of India Limited (ICRA) estimates that the sector will develop at a Compound Annual Growth Rate (CAGR) of 10.5 per cent through 2025 after growing at a CAGR of 7.8 per cent over the past five years. This sector employs more than 22 million people in India, which through skill development is expected to grow at the rate of 5 per cent in 5 years.

### Four significant steps to be undertaken for National Logistics Policy (NLP) include :

1. Integration of Digital System (IDS): There will be digital integration of 30 different systems of seven various departments (like road transport, railways, aviation, commerce ministries and foreign trade).
2. Unified Logistics Interface Platform (ULIP): This ensures shorter and smoother cargo movement and enables the exchange of information confidentially on a real-time basis. This National Industrial Corridor Development Corporation (NICDC) Logistics Data Bank Project has been leveraged.
3. Ease of Logistics (ELOG): will enable and ensure the ease of logistics business through transparency and accessibility. Similarly, a new digital platform Ease of Logistics Services (E-Logs) has also been started for industry associations to resolve issues by reaching out to the government.
4. System Improvement Group: will monitor all logistics-related projects regularly.

### Combined Programmes with National Logistics Policy (NLP) :

The NLP's transformational capacities further increase when combined with previous connectivity and infrastructure improvement programs like:

**The Gati Shakti Programme :** PM GatiShakti, also known as the National Master Plan for multi-modal connectivity, which was introduced in the previous year, was an essential first step. Establishing the National Logistics Policy will support the PM GatiShakti initiative and complementarity.The NLP also offers an e-handbook for standardization of warehousing in the country.

**The SagarmalaProgramme :** Sagarmala Mission envisions using the potential of the coastline and waterways to reduce the amount of infrastructure needed to reach its targets.

**The BharatmalaProgramme :** The Bharatmala programme focuses on reducing critical infrastructure gaps to increase the effectiveness of road traffic circulation across the nation.

# उद्योगांच्या समर्थनार्थ रस्त्यावर उतरा - उद्योगमंत्री उदय सामंत

## महाराष्ट्र चेंबर तर्फे जिल्ह्याचा रोड मॅप - ललित गांधी




**कोकण उद्योग मंथन २०२२ मध्ये मार्गदर्शन करताना उद्योगमंत्री उदय सामंत दुसऱ्या छायाचित्रात मंत्री महोदयांचा सन्मानचिन्ह देवुन सत्कार करताना महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, सोबत संतोष तावडे, आशिष पेडणेकर आदी.**

**रत्नागिरी** : रिफायनरी बाबत उद्योजकांची भूमिका काय असली पाहिजे याचे आत्मचिंतन व्हावे उद्योग मंत्री म्हणून मला असे वाटते की, रिफायनरी किंवा कोणताही उद्योग हवा असेल तर मनापासून समर्थनार्थ रस्त्यावर उतरले पाहिजे परंतु हे लोक व्हॉटस्‌अपवर आहेत आणि उद्योग नको म्हणणारे रस्त्यावर उतरून संघर्ष करत आहेत. जोपर्यंत कोकणात उद्योग हवे आहे असे म्हणणारे रस्त्यावर येत नाही तोपर्यंत कोणत्याही उद्योगाला समर्थन मिळणार नाही. महाराष्ट्रात जिथे जिथे उद्योगांना विरोध होत आहे त्या ठिकाणी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सने थेट रस्त्यावर उतरले पाहिजे. कारण उद्योग आला की, सूक्ष्म, लघु उद्योग किती मोठ्या प्रमाणात वाढतात हे आपणा सर्वांना माहिती आहे असे प्रतिपादन राज्याचे उद्योग मंत्री, रत्नागिरीचे पालकमंत्री उदय सामंत यांनी केले.

उद्योग मंत्री सामंत म्हणाले की, लोटे एमआयडीसी रत्नागिरीतही एमआयडीसी मध्ये अनेक प्रकल्प बंद आहेत. याचा अभ्यास करायला हवा आहे. उद्योग बंद करण्याची मालकाची मानसिकता का होते. स्थानिक राज्य व केंद्र पातळीवरील काही कारणे असतील तर उद्योग विभागाने उत्तर शोधले पाहिजे असे झाले तर वेदांतापेक्षाही जास्त रोजगार महाराष्ट्रात उपलब्ध होतील.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रिकल्चर उद्योजक, सामाजिक संस्थाच्या सहभागातून रत्नागिरी जिल्ह्याचा रोड मॅप बनवणार आहे. या माध्यमातून नवीन गुंतवणूक राज्यांमध्ये येईल. तसेच राज्याचे उद्योग मंत्री रत्नागिरीचे पालकमंत्री उदय सामंत यांच्या माध्यमातून राज्याच्या उद्योग क्षेत्राचा भाग्योदय होणार आहे. तात्काळ निर्णय आणि अंमलबजावणी यामुळे उद्योगातील गुंतवणूक जास्त होईल. रत्नागिरीमध्ये महाराष्ट्र चेंबरच्या माध्यमातून दर महिन्याला एक उपक्रम आयोजित करण्यात येणार असल्याचे



प्रतिपादन महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी केले.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स तर्फे आयोजित उद्योग मंथन कार्यक्रमात ते बोलत होते. मार्गदर्शन करतांना ते म्हणाले की, तरुण उद्योजकांना प्रोजेक्ट रिपोर्ट सुद्धा महाराष्ट्र चेंबर तर्फे बनवून देऊ. अमेरिकेमध्ये आंबा महोत्सव भरवण्याचे नियोजन आहे. दि. २ ते ११ डिसेंबरला महाराष्ट्र इंटरनॅशनल ट्रेड एक्स्पो आयोजित केला आहे. एमआयडीसीमध्ये बंद उद्योग, कारखान्यांच्या बाबत शासनाने धोरण आखावे, स्थानिकांना तेथे उद्योग सुरू करता येईल. भारताबाहेरील ४२ महाराष्ट्र मंडळांसोबत महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचा करार झाला आहे. त्यामुळे मराठी माणसांनी महाराष्ट्रात गुंतवणूक करावी याकरता प्रयत्न सुरू असून केंद्र सरकारचे सहकार्य लाभत आहे. याप्रसंगी बँक ऑफ इंडियाचे अधिकारी श्री. काळे, एमएसईबी विभागाचे मुख्य व्यवस्थापक कुमार प्रमोद सिंग यांनी बँक ऑफ इंडियाच्या योजनांची माहिती सांगितली. जिल्हा उद्योग केंद्राच्या महाव्यवस्थापक विद्या कुलकर्णी यांनी योजनांची माहिती दिली. मुख्य कार्यक्रमांमध्ये डॉ. श्रीधर ठाकूर, रवींद्र घोसाळकर, केशवराव इंदूरकर, दीपक गंद्रे, शाळीग्राम खातू, महेंद्र जैन, भाऊ देसाई, सुजित झिमन व्यासपीठावर उपस्थित होते. जिल्हा नियोजन अधिकारी सत्यवान मुळे, हॉटेल असोसिएशनचे राकेश भोसले, अभिजीत जेथे, सुबोध साळवी, शिल्पा बुलाखे, प्रमोद केळकर, विनय आंबुलकर यांचा सन्मान केला.

# महाराष्ट्र चेंबरच्या रत्नागिरी जिल्हा कार्यालयाचे उद्योग मंत्री उदय सामंत यांच्या हस्ते उद्घाटन






महाराष्ट्र चेंबरच्या रत्नागिरी जिल्हा कार्यालयाचे फीत कापून उद्घाटन करताना उद्योगमंत्री उदय सामंत, महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, विश्वस्त मंडळाचे चेअरमन आशिष पेडणेकर, पर्यटन समितीचे चेअरमन संतोष तावडे आदी.

## महाराष्ट्र चेंबरच्या कार्यालयामुळे कोकणातील व्यापार उद्योगाला चालना मिळेल - उद्योगमंत्री उदय सामंत

### कोकणातील उद्योग व्यापाराच्या विकासासाठी चेंबरला संपूर्ण सहकार्याचे नाम. उदय सामंत यांचे आश्वासन

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रिकल्चरच्या रत्नागिरी जिल्हा कार्यालयाचे उद्घाटन उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते व महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, विश्वस्त मंडळाचे चेअरमन आशिष पेडणेकर व पर्यटन समितीचे चेअरमन संतोष तावडे यांच्या प्रमुख उपस्थितीत शनिवार दि. ८ ऑक्टोबर २०२२ रोजी झाले. महाराष्ट्र चेंबर व्यापार, उद्योग व कृषी क्षेत्रासाठी करत असलेले कार्य कौतुकास्पद असून कोकणातील व्यापार उद्योग व कृषी क्षेत्राच्या विकासासाठी रत्नागिरी जिल्हा कार्यालयाच्या माध्यमातून उत्कृष्ट कार्य होईल व त्यासाठी चेंबरला आवश्यक ते सर्व सहकार्य शासनाच्या वतीने करण्यात येईल असे आश्वासन उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिले.

सुरुवातीला महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी उद्योगमंत्री उदय सामंत यांचे स्वागत केले व महाराष्ट्र चेंबरच्या कार्याची माहिती देऊन वार्षिक सर्वसाधारण सभेत झालेल्या निर्णयानुसार राज्यातील प्रत्येक जिल्ह्यामध्ये चेंबरचे कार्यालय सुरू करण्याच्या निर्णयानुसार आज रत्नागिरी जिल्हा कार्यालयाचे उद्घाटन माननीय उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते करून कोकणातील व्यापार उद्योग व कृषी क्षेत्राच्या विकासासाठी महत्त्वाचे उपक्रम राबवून व तरुणांना, महिलांना व्यापार उद्योग करण्यासाठी कौशल्य विकास व शासनाच्या विविध योजनांची माहिती देऊन प्रोत्साहित करण्याचे कार्य महाराष्ट्र चेंबरतर्फे करण्यात येणार असल्याचे महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी सांगितले.

याप्रसंगी कार्यकारणी सदस्य मनोज वालावलकर, राजन नाईक, अजित शिराळकर आदींसह महाराष्ट्र चेंबरचे सदस्य व उद्योजक, व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राज्यात लॉजिस्टिक पार्क आणि नऊ ड्रायपोर्ट सुरू करणार - उद्योगमंत्री उदय सामंत

## पूणे मर्चंटस् चेंबरचा पुरस्कार वितरण सोहळा उत्साहात संपन्न



कार्यक्रमाचे दिपप्रज्वलन करून उद्घाटन करताना उद्योग मंत्री उदय सामंत, महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, उद्योगपती प्रकाश धारीवाल, पुना मर्चंट चेंबरचे अध्यक्ष राजेंद्र बाठिया समवेत पदाधिकारी.

पूना मर्चंट चेंबरच्या वतीने व्यापार महर्षी उत्तमचंदजी उर्फ बाबा पोखरणा यांच्या स्मृतीनिमित्त आदर्श व्यापारी उत्तम पुरस्काराचे वितरण फातिमानगर येथील महात्मा फुले सांस्कृतिक भवन येथे संपन्न झाले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उद्योग मंत्री उदय सामंत होते. याप्रसंगी व्यासपीठावर महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲग्रिकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी, उद्योग उद्योगपती प्रकाश धारिवाल, पुना मर्चंट चेंबरचे अध्यक्ष राजेंद्र भाटिया, उपाध्यक्ष अजित बोरा, रायकुमार नहार, ईश्वर नहार, प्रवीण चोरबेले उपस्थित होते. याप्रसंगी उद्योग मंत्री उदय सामंत यांनी राज्यात उद्योग व रोजगार वाढला पाहिजे, राज्याला पुढे घेऊन जायचे असल्यास व्यापारांचे प्रश्न सुटले पाहिजेत आमच्यावर ही जबाबदारी आहे. राज्यात वेदांता पेक्षा दुप्पट रोजगार निर्माण करायचा आहे. सरकार दरवर्षी २५००० उद्योजक निर्माण करणार आहे त्यांच्यामधून ५० हजार लोकांना रोजगार निर्माण होतील. समस्या सोडविण्यासाठी शासन आणि व्यापाऱ्यांच्या संघटना यांनी एकत्र काम करणे गरजेचे आहे. राज्यात रोजगार वाढविण्यासाठी केंद्रीय परिवहन मंत्री नितीन गडकरी यांच्या पुढाकाराने दहा लॉजिस्टिक पार्क आणि नऊ ड्रायपोर्ट सुरू करण्यात येत आहे. पहिला ड्रायपोर्ट जालना येथे उभारण्यात येणार असल्याचे उदय सामंत यांनी सांगितले.

राज्यातील व्यापार, उद्योग व रोजगार वाढावा यासाठी उद्योगवृध्दी यात्रा व महिला उद्योजकता अभियान राबविण्यात येत असून त्यामाध्यमातून तरूणांना व महिलांना व्यापार, उद्योग करण्यासाठी प्रोत्साहित करण्यात येणार आहे. तसेच शासनाच्या योजनांची माहिती देण्यात येणार आहे. तसेच महाराष्ट्र चेंबरतर्फे सुरू असलेल्या विविध उपक्रमांची माहिती महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी दिली. तसेच पुरस्कार त्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी उद्योग मंत्री उदय सामंत महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी पुना मर्चंट चेंबरचे अध्यक्ष राजेंद्र भाटिया यांच्या हस्ते आदर्श व्यापारी उत्तम पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यामध्ये राज्यस्तरीय पुरस्कार रत्नागिरीचे सुहास पटवर्धन पुणे जिल्हास्तरीय पुरस्कार सतीश चोरडिया पुणे शहर स्तरीय पुरस्कार श्याम अग्रवाल चेंबरच्या सभासदांमधून देण्यात येणारा पुरस्कार जवाहरलाल बोथरा आणि आदर्श पत्रकार पुरस्कार हर्षद कटारिया यांना देण्यात आला. महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांचा पुना मर्चंट चेंबरचे अध्यक्ष राजेंद्र बाठीया यांनी स्मृतिचिन्ह देऊन सत्कार केला. यावेळी उषा अग्रवाल, जवाहरलाल बोथरा, सौ. चोरडिया यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राजेंद्र भाटिया यांनी केले तर अजित बोरा महावीर भाटिया अशी जुगल यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली आभार प्रदर्शन ईश्वर नहार यांनी केले. सूत्रसंचालन भूषण करंदीकर यांनी केले.



उद्योग मंत्री उदय सामंत, महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, पुना मर्चंट चेंबरचे अध्यक्ष राजेंद्र भाटिया यांच्या हस्ते आदर्श व्यापारी उत्तम पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

# महाराष्ट्रातील उद्योग प्रकल्पांचे प्रलंबित अनुदान त्वरित अदा करावे : ललित गांधी

## उद्योग मंत्री उदय सामंत यांचा महाराष्ट्र चेंबरला सकारात्मक प्रतिसाद



उद्योगांच्या प्रलंबित अनुदान व अन्य मागण्यासंबंधी उद्योग मंत्री उदय सामंत यांच्या समवेत च्या बैठकीत चर्चा करताना ललित गांधी, संदीप भंडारी, सागर नागरे व अन्य

**मुंबई** : महाराष्ट्रातील वेगवेगळ्या जिल्ह्यातील उद्योगांचे गेल्या दोन वर्षांपासूनचे प्रलंबित अनुदान राज्य सरकारने तत्काळ वितरित करावे अशी आग्रही मागणी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजचे अध्यक्ष ललित गांधी यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उद्योग मंत्री उदय सामंत यांच्याकडे केली.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स शिष्टमंडळाने उद्योगधंद्याच्या प्रलंबित अनुदान संबंधी मुंबई येथे राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उद्योग मंत्री उदय सामंत यांची भेट घेतली.

ललित गांधी यांनी यावेळी राज्यातील उद्योग प्रकल्पांचे प्रलंबित अनुदान सुमारे ७००० कोटी इतके आहे. त्यापैकी सरकारने ३००० कोटी रुपये अनुदान मंजूर केले असून ६३० कोटी रुपये प्रत्यक्ष वितरित केले असल्याचे सांगून मंजूर रकमेपैकी उर्वरित २३७० कोटी रुपये एकरकमी अदा करावेत अशी मागणीही ललित गांधी यांनी केली.

उद्योग मंत्री उदय सामंत यांनी सरकारने याविषयी अनुदान लवकर वितरित व्हावी अशी भूमिका घेतली असून तात्काळ हे अनुदान वितरित करण्याचा आमचा प्रयत्न राहील. मंजूर रक्कम एक अथवा दोन टप्प्यात ताबडतोब वितरित करण्याचे आदेश निर्गमित केले जातील असे सांगितले.

ललित गांधी यांनी यावेळी नवीन व विस्तारित उद्योग प्रकल्पांच्या अनुदान योजनेच्या पात्रतेसाठीची मर्यादा कोरोना काळातील दोन वर्षाचा काळ गृहीत धरता यापुढे दोन वर्षे वाढवण्याची मागणीही केली.

तसेच औद्योगिक वसाहती मधील विविध प्रलंबित प्रश्न उद्योग जगतांच्या अन्य मागण्या संबंधी उद्योग मंत्री व महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीचे पदाधिकारी यांची संयुक्त बैठक लवकरच घेऊ असे आश्वासन उदय सामंत यांनी ललित गांधी यांना दिले.

# महाराष्ट्र व गोवा राज्य उद्योग वाढीसाठी संयुक्त उपक्रम राबवणार : ना. प्रमोद सावंत

## इन्व्हेस्ट गोवा परिषदेत महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स बरोबर सामंजस्य करार





**महाराष्ट्र व गोवा यांच्यातील सामंजस्य कराराचे गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत, उद्योग मंत्री मावीन गोदीना यांच्या उपस्थितीत हस्तांतरण करताना ललित गांधी, राल्फ डिसूजा. दुसऱ्या छायाचित्रात महाराष्ट्रातील गुंतवणूक संधीचा अहवाल मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांना सादर करताना ललित गांधी सोबत माजी मंत्री सुरेश प्रभू.**

उद्योगात अग्रेसर असलेल्या महाराष्ट्राच्या व्यापार उद्योग क्षेत्राची शिखर संस्था 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँण्ड अग्रिकल्चर' व गोवा सरकार आणि गोवा चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज उद्योग वाढीसाठी संयुक्त उपक्रम राबवतील अशी अपेक्षा गोव्याचे मुख्यमंत्री नामदार प्रमोद सावंत यांनी व्यक्त केली. इन्व्हेस्ट गोवा या गुंतवणूक परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज' च्या वतीने अध्यक्ष ललित गांधी, गोवा चेंबर कॉमर्स इंडस्ट्रीज च्या वतीने अध्यक्ष राल्फ डिसूजा यांनी सामंजस्य करारावर सह्या केल्या व सामंजस्य करारांचे आदान प्रदान केले, त्याप्रसंगी ते बोलत होते.

माजी केंद्रीय मंत्री सुरेश प्रभू , गोव्याचे उद्योग मंत्री मावीन गोदीना, गोव्याचे पर्यटन व आयटी उद्योग मंत्री रोहन खुंटे, इन्व्हेस्ट गोवा परिषदेचे निमंत्रक मांगिरिश रायकर आदी मान्यवर यावेळी व्यासपीठावर उपस्थित होते.

महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक, तेलंगणा आदी विविध राज्यातून मोठ्या संख्येने उद्योजक व गुंतवणूकदार या परिषदेस उपस्थित होते. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज या शतक महोत्सवी शिखर संस्थेतर्फे चेंबरच्या कार्यक्षेत्रातील गोवा चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज तर्फे बरोबर सामंजस्य करार करून दोन्ही राज्यातील उद्योग वाढीसाठी विविध स्तरावर प्रयत्न करणार असल्याची माहिती देऊन ललित गांधी यांनी गोवा येथे महाराष्ट्रातील उद्योजकांसाठी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सच्या वतीने सुविधा केंद्र व कौशल प्रशिक्षण केंद्र उभारण्याची घोषणा केली. गोव्याचे मुख्यमंत्री डॉक्टर प्रमोद सावंत. माजी मंत्री सुरेश प्रभू आदी मान्यवरांच्या उपस्थितीत गोव्याच्या नवीन उद्योग धोरणाच्या पुस्तिकेचे याप्रसंगी अनावरण करण्यात आले. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज च्या वतीने महाराष्ट्रात उपलब्ध असलेल्या उद्योगाच्या व नवीन गुंतवणुकीच्या विविध संधींचा एक अहवाल ललित गांधी यांनी मुख्यमंत्री प्रमोद सावंत सादर केला. तसेच २ डिसेंबर ते ११ डिसेंबर या कालावधीत मुंबई येथे महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज, महाराष्ट्र सरकार व केंद्र सरकारचा उद्योग विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय व्यापार उद्योग परिषद आयोजित केल्याची माहिती देऊन गोवा सरकारला त्यात सहभागी होण्याचे आमंत्रण दिले. गोव्याचे मुख्यमंत्री नामदार डॉ. प्रमोद सावंत यांनी या आमंत्रणाचा स्वीकार केल्याचे सांगितले.

मुंबईत संपन्न होणाऱ्या या व्यापार उद्योग परिषदेस देशातील उद्योजकांनी सहभागी व्हावे असे आमंत्रण ललित गांधी यांनी उपस्थित त्यांना याप्रसंगी दिले.

# भारत इंग्लंड दरम्यान व्यापार वृद्धीसाठी विशेष योजना बनवू : ब्रिटिश खासदार जॉन वेवरली

## महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स भेटी प्रसंगी ललित गांधी यांना आश्वासन





**ब्रिटिश खासदार जॉन वेवरली यांना महाराष्ट्र चेंबरच्या आंतरराष्ट्रीय प्रदर्शनाचे आमंत्रण देताना चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, सोबत विक्रम शिवलिंगम, एस. विजय. दुसऱ्या छायाचित्रात महाराष्ट्र चेंबरच्या मुख्यालयामध्ये ब्रिटिश खासदार व मंत्री जॉन वेवरली यांच्याशी चर्चा करताना चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी.**

इंग्लंड संसदेचे मंत्री - हाऊस ऑफ लॉर्ड्स / इंग्लंड - भारत ट्रेड आणि इन्व्हेस्टमेंटच्या सर्वपक्षीय संसदीय गटाचे उपाध्यक्ष लॉर्ड वेवरली यांनी महाराष्ट्र चेंबरच्या मुंबई कार्यालयात २९सप्टेंबर २०२२ रोजी महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांची भेट घेतली. याप्रसंगी इंग्लंड आणि भारतामध्ये मध्ये व्यापार ,उद्योग वाढावा, गुंतवणूक वाढावी व अत्याधुनिक तंत्रज्ञान, लॉजिस्टिक या क्षेत्राला प्राधान्य देऊन भरीव काम करण्याच्या दृष्टीने चर्चा केली. महाराष्ट्र चेंबरच्या संयुक्त विद्यमाने भारत व युकेमध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञान, सप्लाय चैन, लॉजिस्टिक या क्षेत्रात भरीव काम करण्याचे व भारत इंग्लंड दरम्यान व्यापार वृद्धीसाठी विशेष योजना बनविण्याचे आश्वासन लॉर्ड वेवरली यांनी अध्यक्ष ललित गांधी यांना दिले.

याप्रसंगी महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी इंग्लंड संसदेचे मंत्री लॉर्ड वेवरली यांचे स्वागत केले व महाराष्ट्र चेंबरच्या कार्याची माहिती दिली. जागतिक स्तरावर व्यापार उद्योग वाढावा यासाठी महाराष्ट्र चेंबर करत असलेल्या कार्याची माहिती दिली. महाराष्ट्र चेंबरतर्फे जागतिक गुंतवणूक परिषदेची स्थापना केल्याचे सांगितले. भारत इंग्लंड मध्ये व्यापार - उद्योगामध्ये गुंतवणूक वाढावी, अत्याधुनिक तंत्रज्ञानाची व माहितीची देवाण घेवाण करणे, सप्लाय चैन, लॉजिस्टिक क्षेत्रात भरीव काम करण्यावर भर द्यावा. सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना कशी मदत करता येईल, प्रोत्साहन देता येईल याविषयी काम करण्यात यावे असे महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी सांगितले. तसेच महाराष्ट्र चेंबरतर्फे मुंबई येथे डिसेंबरमध्ये आयोजित करत असलेल्या मायटेक्स प्रदर्शनाची माहिती देऊन प्रदर्शनात सहभागी होण्याचे निमंत्रण लॉर्ड वेवरली यांना दिले.

इंग्लंड संसदेचे मंत्री - हाऊस ऑफ लॉर्ड्स / इंग्लंड - भारत ट्रेड आणि इन्व्हेस्टमेंटच्या सर्वपक्षीय संसदीय गटाचे उपाध्यक्ष लॉर्ड वेवरली यांनी महाराष्ट्र चेंबरच्या कार्याचे कौतूक केले. तसेच महाराष्ट्र चेंबरतर्फे मुंबई येथे डिसेंबरमध्ये आयोजित करत असलेल्या मायटेक्स प्रदर्शनात सहभागी होण्याचे आश्वासन अध्यक्ष ललित गांधी यांना दिले.

याप्रसंगी इंटरनॅशनल रिसर्च इन्स्टिटयूट फॉर मॅन्युफॅक्चरिंगचे संचालक आनंद लुई, संस्थेचे उद्योग व्यवस्थापक विक्रम एस. , महाराष्ट्र चेंबरचे प्रभारी सरकार्यवाह सागर नागरे उपस्थित होते.




महाराष्ट्र चेंबरच्या सभासदांना देण्यात येणाऱ्या 'स्मार्ट डिजिटल कार्ड' चे अनावरण करताना मुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे, ललित गांधी व सागर नागरे

# महाराष्ट्र चेंबरचा तंत्रज्ञानातील पुढाकार राज्यातील व्यापार, उद्योग वृध्दीसाठी उपयुक्त - मुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे

मुंबई :- सभासदांना द्यावयाचे ओळखपत्र "**डिजिटल स्मार्ट कार्ड** " स्वरुपात देऊन तंत्रज्ञान वापरात एक पाऊल पुढे टाकले आहे. तंत्रज्ञानाचा हा वापर राज्यातील व्यापार - उद्योग वृध्दीसाठी उपयुक्त ठरेल असे प्रतिपादन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे यांनी केले.

महाराष्ट्र चेंबर तर्फे सभासदांना देण्यात येणाऱ्या ओळखपत्रा द्वारे सभासदांना आपापसात व्यापार करता येईल, वेगवेगळया सवलतींसाठी उपयोग होईल अशा पध्दतीचे आधुनिक क्यु आर कोड आधारीत बनवन्यात आले आहे. सदर '**स्मार्ट डिजिटल बिझनेस कार्ड**'चे अनावरण मुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे यांचे हस्ते करण्यात आले. त्याप्रसंगी ते बोलत होते.







चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी डिजीटल स्मार्ट कार्ड ची संकल्पना समजावुन सांगितली, तसेच सर्व सभासदांनी त्यांचे कार्ड बनविन्यासाठी आवश्यक ती माहिती व स्वतःचा फोटो लवकरात लवकर सादर करावा असे अवाहन केले.

सभासदांची माहीती अद्यायावत करुन घेण्यासाठी लवकरच सर्व सभासदांना एक लिंक पाठविली जाईल असे जनरल सेक्रेटरी सागर नागरे यांनी सांगितले.

# सर्वच क्षेत्रात मुलींच्या कर्तुत्वाची सोनेरी पावले

## एसव्हीकेएममध्ये महिला उद्योजक समितीच्या अध्यक्षा संगीता पाटील यांचे प्रतिपादन



महिला सशक्तीकरण ही काळाची गरज आहे आज मुली सर्वच क्षेत्रात अग्रेसर ठरत आहेत येणारा काळ हा अनेक आव्हानांचा असून त्या सक्षमपणे महिलाच सामोरे जाऊ शकतात शिक्षण असो वा उद्योग प्रत्येक क्षेत्रात मुली आपल्या कर्तुत्वाची सोनेरी पावले उमटत आहेत असे प्रतिपादन महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रिकल्चरच्या महिला उद्योजकता समितीच्या चेअरपर्सन सौ. संगीता पाटील यांनी केले. शिरपूर एसव्हीकेएम, एनएमआयएमएस अभिमत विद्यापीठ अंतर्गत सीटीएफ तर्फे मुलींसाठी वस्त्रोद्योग क्षेत्रात उपलब्ध असलेल्या विविध करियर संधी या विषयावर मार्गदर्शनपर कार्यक्रम संपन्न झाला.

याप्रसंगी संगीता पाटील मार्गदर्शन करताना म्हणाल्या की, सध्या आणि येणाऱ्या दशकात भारत हा सर्वात तरुण देश म्हणून जगाच्या पाठीवर आपली अधिसत्ता गाजवणार आहे मुलींनी स्वतःवरील आत्मविश्वास प्रबळ करत आव्हानांना सामोरे जावे यातून अनुभव आणि यश या दोन्ही गोष्टी पदरी पडतात कुशलता चाणक क्षेपणा निर्णय क्षमता असे अनेक गुण मुलींमध्ये उपजतच असतात आणि त्याच गुणांना वाव देऊन या क्षेत्रामध्ये उत्तुंग यशोशिखरे गाठले जाऊ शकतात स्पर्धे च्या या युगात आपण असेच क्षेत्र निवडावे ज्यात आपल्या सुप्त गुणांना वाव मिळेल आणि कार्याचे समाधान देखील मिळेल.

शंका समाधान सत्रात मुलींनी विचारलेल्या महत्त्वपूर्ण शंकांचे निरसन देखील संगीता पाटील यांनी केले कार्यक्रमास एच आर पटेल कन्या माध्यमिक विद्यालय आरसी पटेल महाविद्यालय पीपीएम हायस्कूल येथील विद्यार्थिनी शिक्षक तसेच पालकांची उपस्थिती होती.

# महाराष्ट्रातील महिलांना आत्मनिर्भरतेसाठी केंद्र सरकारकडून पाठबळ देणार - स्मृती इराणी



**महाराष्ट्र चेंबरच्या महिला उद्योजकता धोरणाच्या लोगोचे केंद्रीय महिला व बालकल्याण मंत्री स्मृती इराणी यांच्या हस्ते अनावरण**

महाराष्ट्र चेंबरच्या महिला उद्योजकता धोरणाच्या लोगोचे केंद्रीय महिला व बालकल्याण मंत्री स्मृती इराणी यांच्या हस्ते अनावरण करण्यात आले. महाराष्ट्र राज्यातील महिलांना उद्योग व व्यापार क्षेत्रात आत्मनिर्भर होण्यासाठी केंद्र सरकारकडून सर्व पाठबळ पुरवण्यात येईल असे आश्वासन केंद्रीय महिला व बालकल्याण विकास मंत्री स्मृती इराणी यांनी अध्यक्ष ललित गांधी यांना दिले.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रिकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी यांच्या नेतृत्वाखाली महिला उद्योजकता विकास समितीच्या शिष्टमंडळाने केंद्रीय महिला व बालकल्याण मंत्री स्मृती इराणी यांची दिल्ली येथे भेट घेतली.

सुरुवातीला महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी महाराष्ट्र चेंबरतर्फे राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली व महिला उद्योजकता समितीतर्फे राज्यात महिला उद्योजकता धोरणातंर्गत विविध उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे सांगितले.

महिला उद्योजकता समितीच्या चेअरपर्सन सौ. संगीता पाटील यांनी महाराष्ट्र चेंबरच्या महिला उद्योजकता समितीतर्फे राज्यातील महिलांसाठी महिला उद्योजकता धोरण संदर्भात माहिती दिली. तसेच या धोरणाअंतर्गत राज्यातील महिलांना व्यापार उद्योग करण्यासाठी व आत्मनिर्भर बनवण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत असून शासनाच्या योजनांची माहिती देऊन प्रशिक्षण कार्यक्रम राबवून कार्यशाळा घेण्यात येत असल्याचे सांगितले. तसेच महिला उद्योजकांना व्यापार उद्योग क्षेत्रात येत असलेल्या विविध अडचणी संदर्भात माहिती दिली. राज्यातील महिला उद्योजक संख्येची वाढ व्हावी व त्यांना प्रोत्साहन देण्यात यावे यासाठी महाराष्ट्र चेंबर प्रयत्नशील असल्याचे सौ. संगीता पाटील यांनी याप्रसंगी सांगितले.

शिष्टमंडळामध्ये महिला उद्योजकता समितीच्या को -चेअरपर्सन सौ. कविता देशमुख, महिला समिती सदस्य श्वेता इनामदार, अंबिका हिंगमिरे कार्यकारणी सदस्य व युथ विंग समितीचे चेअरमन संदीप भंडारी व महिला उद्योजक उपस्थित होत्या.

# उत्तर महाराष्ट्र कार्यकारीणी सदस्य व तज्ञ समिती चेअरमन, को चेअरमन, सदस्य यांची बैठक



**उत्तर महाराष्ट्र कार्यकारीणी सदस्य व तज्ञ समिती चेअरमन, को चेअरमन, सदस्य बैठकीप्रसंगी अध्यक्ष ललित गांधी, उपाध्यक्ष सुधाकर देशमुख, उत्तर महाराष्ट्र शाखा को चेअरमन संजय सोनवणे व कार्यकारीणी सदस्य.**

अध्यक्ष श्री. ललित गांधी यांच्या अध्यक्षतेखाली रविवार दिनांक ९ ऑक्टोबर २०२२ रोजी दुपारी ४ वाजता पद्मश्री बाबुभाई राठी सभागृहात संपन्न झाली. अध्यक्ष ललित गांधी यांनी उत्तर महाराष्ट्र शाखा कार्यालयासाठी १००० स्क्वेअर फुट जागा औद्योगिक वसाहतीत मिळणार असल्याचे सांगितले. उद्योग मंत्री उदय सामंत यांनी याबाबत प्रादेशिक अधिकाऱ्यांना प्रस्ताव पाठविण्याचे आदेश दिल्याचे सांगितले. पदग्रहण समारंभ प्रसंगी जाहीर केल्याप्रमाणे ३६ जिल्ह्यात ३६ क्लस्टर निर्माण करण्यासाठी विविध कंपन्या स्थापन करण्यात येणार आहे. त्यासाठी मुख्य कंपनी स्थापन करण्याची प्रक्रिया सुरू झाली असून लवकरच त्याचे रजिस्ट्रेशन करण्यात येत आहे. सर्व सदस्यांनी या कंपनीमध्ये गुंतवणूक करावी असे आवाहन केले. तसेच जिल्हास्तरावर काम करण्यासाठी डिस्ट्रिक्ट डेव्हलपमेंट फोरम स्थापन करण्यात यावे. यामध्ये जिल्हाधिकारी, मनपा आयुक्त, जिल्हा उद्योग केंद्राचे सहसंचालक ,महाव्यवस्थापक, पोलीस आयुक्त व विविध संघटनांचे पदाधिकारी यांचा समावेश करून महाराष्ट्र चेंबर मध्ये बैठक घेण्यात यावी, तसेच दर महिन्याला एक उपक्रम आयोजित करण्यात यावा, सभासदांचे ग्रुप तयार करून दर महिन्याला बी टू बी मीट आयोजित करण्यात यावी असे सांगून उपस्थित कार्यकारणी सदस्यांनी मांडलेल्या विविध समस्या व सूचनाबाबत मार्गदर्शन केले व लेखी स्वरूपात सर्वांनी महत्त्वाचे मुद्दे द्यावे असे सांगितले. तसेच महाराष्ट्र चेंबरचे रत्नागिरी जिल्हा कार्यालयाचे उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते उद्घाटन झाले. अतिशय चांगला प्रतिसाद मिळाला याप्रसंगी उद्घाटनप्रसंगी ६ पेट्रोन सभासद झाल्याचे अध्यक्ष ललित गांधी यांनी सर्वांना सांगितले.

उपाध्यक्ष सुधाकर देशमुख यांनी अध्यक्ष श्री. ललित गांधी यांचे व उपस्थित कार्यकारणी सदस्यांचे स्वागत केले. उत्तर महाराष्ट्र शाखा को चेअरमन संजय सोनवणे यांनी प्रास्ताविक केले. प्रास्ताविकात प्रास्ताविकात संजय सोनवणे यांनी रेल्वे विषयीच्या समस्या सांगितल्या मनमाड इंदोर रेल्वे नाशिक शिर्डी रेल्वे मार्ग नाशिक सुरत रेल्वे मार्ग तसेच नाशिकला थांबा नसलेल्या नऊ रेल्वे गाड्यांना थांबा देण्यात यावा यासाठी चेंबरने शासनाकडे आपली भूमिका मांडावी असे सांगितले तसेच नाशिक जिल्ह्यात गेल्या अनेक वर्षांपासून मोठा उद्योग आलेला नाही त्यासाठी प्रयत्न करावा.

याप्रसंगी सचिन शहा यांची श्री. पंचवटी एज्युकेशन सोसायटीच्या संचालकपदी निवड झाल्याबद्दल अध्यक्ष श्री. ललित गांधी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. श्री प्रफुल्ल संचेती यांची विश्वस्त पदी निवड झाल्याबद्दल व श्री दत्ता भालेराव यांची निवड झाल्याबद्दल तसेच रतन पडवळ यांची निवड झाल्याबद्दल अध्यक्ष ललित गांधी यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार





